



परळी **संघर्षनेता**

समता, बंधुता, न्याय, अधिकारांचा नेता

https://www.parlisangharshneta.in 9881265102 संपादक - मोहन व्हावळे

बीड | वर्षे- 11 वे | अंक क्र 132 | शनिवार दि. 06 जुन 2026 | पृष्ठे 4 | किंमत 2 ₹ | RNI: MAHMAR/2016/67060




# ना. पंकजाताई मुंडे यांनी आईसह घेतले श्रीक्षेत्र पुरुषोत्तम पुरीतील भगवंतांचे दर्शन

### कार्यकर्त्यांनी गावोगावी केले जल्लोषात स्वागत ; जागतिक पर्यावरण दिनानिमित्त केले वृक्षारोपण



माजलगांव दि. 05 -अधिकमासाचे औचित्य साधून राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांनी आई प्रज्ञाताई मुंडे यांच्यासह आज श्रीक्षेत्र पुरुषोत्तम पुरीला भेट देऊन भगवंताचे मनोभावे दर्शन घेतले. दौऱ्यात जागोजागी कार्यकर्त्यांनी वाहनाचा ताफा थांबवून त्यांचे वाजत-गाजत जल्लोषात स्वागत केले. जागतिक पर्यावरण दिनानिमित्त त्यांच्या हस्ते भाजयुमोच्या वतीने वृक्षारोपण देखील करण्यात आले.

अधिक मासाचे औचित्य साधून भगवान पुरुषोत्तम यांच्या दर्शनाला आणि पूजेला अध्यात्मिकदृष्ट्या अत्यंत विशेष महत्त्व आहे. ना. पंकजाताई मुंडे यांनी आज आई प्रज्ञाताई मुंडे यांच्यासोबत मंदिराला भेट देऊन ईश्वराचे मनोभावे दर्शन घेतले आणि विधिवत पूजा-अर्चा केली. सर्व सामान्य जनतेच्या जीवनात सुख, समृद्धी, उत्तम आरोग्य आणि मंगलमयता लाभो, अशी प्रार्थना त्यांनी भगवान पुरुषोत्तम यांच्या चरणी केली. यावेळी भाजपचे नेते अरूण राऊत, माधव निर्मळ, डॉ. अशोक तिडके, ज्ञानेश्वर मेंडके, मंडलाध्यक्ष रुपाली कचरे, शरद कचरे, विनायक रत्नपारखी, अभिजित सोळंके, भाजयुमोचे जिल्हाध्यक्ष संजय आंधळे, दिपक मुंडे, पान 3 वर

# मराठा समाजासाठी फडणवीस सरकारचा महत्वाचा निर्णय

### मराठा समाजाला इतर मागासवर्गीयांप्रमाणे 8 सवलती लागू




मुंबई: मराठा आंदोलक मनोज जरांगे यांच्या उपोषण आंदोलनानंतर मराठा समाजालतील विद्यार्थ्यांना इतर मागासवर्गीयांप्रमाणेच सर्व शैक्षणिक व योजना लागू करण्याचा निर्णय राज्य सरकारकडून घेण्यात आल आहे. याविषयीचा शासन निर्णय जारी करण्यात आला असून यामुळे मराठा समाजातील विद्यार्थी देखील शैक्षणिक सवलती व सोयीसुविधांनासाठी पात्र ठरणार आहेत. 2026-27 या चालू शैक्षणिक वर्षापासूनच या योजनांचा लाभ मराठा समाजाला दिला जाणार आहे.

मराठा समाजातील विद्यार्थ्यांना देखील इतर मागास प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांप्रमाणे सर्व शैक्षणिक सवलती आणि योजनांचा लाभ मिळावा अशी मागणी मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी केली होती. मराठा आरक्षण उपसमितीच्या बैठकीत चर्चा झाल्यानंतर मराठा समाजाला शैक्षणिक सवलती योजनांचा लाभ देण्यास येणाऱ्या अडचणींवर चर्चा करण्यात आली. त्यावेळी यासाठी निधीची स्वतंत्र तरतूद करणे, महाडीबीटी पोर्टलवर आवश्यक ते तांत्रिक बदल करण्याची आवश्यकता असल्याचे समोर आले.

तसेच सर्व विभागांना याबाबतचे निर्देश देण्याचीही आवश्यकता असल्याने सामान्य प्रशासन विभागाने पान 3 वर

# आज ठळक

## मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाचे यश; आरक्षणासाठी बलिदान देणाऱ्यांच्या वारसांना प्रत्येकी दहा लाख मंजूर



मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी कुणबी प्रमाणपत्र आणि त्या आधारे मराठा समाजाला ओबीसींचे आरक्षण लागू करा, या व इतर मागण्यासाठी आतापर्यंत नऊ वेळा उपोषण केले. हैदराबाद गॅझेटनूसार नोंदी घेण्याच्या जीआरची अंमलबजावणी, सातारा, कोल्हापूर, औंध गॅझेट, मराठा समाजासाठी स्वतंत्र मंत्रालय, आंदोलना दरम्यान दाखल गुन्हे मागे घेण्याची मागणी, बलिदान दिलेल्यांच्या वारसांना आर्थिक मदत आणि नोकरी अशा विविध मागण्यासाठी जरांगे पाटील यांनी 30 मे रोजी अंतरवाली सराटीत रखरखत्या उन्हात उपोषण केले होते.

सरकारच्या वतीने मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, भाजपाचे आमदार प्रसाद लाड यांनी मनोज जरांगे पाटील यांच्या मागण्यांवर 12 मुद्यांचा समावेश करत त्याचा मसुदा आणि त्याचे जीआरमध्ये रुपांतर करण्याचे आश्वासन दिल्यानंतर त्यांनी आपले पान 3 वर

## कॉकरोच पार्टीचा संस्थापक अभिजीत दिपके आज भारतात येणार



कॉकरोच जनता पार्टीच्यावतीनं उद्या दिल्लीतील जंतरमंतर मैदानावर परीक्षांमधील घोटाळ्यांविरोधात जनआंदोलन करण्यात येणार आहे, या आंदोलनासाठी अभिजीत दिपके भारतात येणार आहे. पण तत्पूर्वीच छत्रपती संभाजीनगर इथं राहणाऱ्या त्याच्या आई-वडिलांनी घरं सोडलं आहे. त्याच्या घरात कोणीही नसताना पोलिसांचा बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. पण नेमकं काय घडलंय? ज्यामुळं त्याच्या कुटुंबाला दुसरीकडे जावं लागलं जाणून घेऊयात.अमेरिकेतील बोस्टनमध्ये राहणारा आणि कॉकरोच जनता पार्टीचा संस्थापक अभिजीत दिपके 6 जूनला भारतात येणार असून दिल्लीतील जंतर-मंतरवर शिक्षण व्यवस्थेतील त्रुटींविरोधात आंदोलन करणार आहे. नुकत्याच झालेल्या नीट पेपर लीक, त्यामुळं विद्यार्थ्यांनी केलेल्या आत्महत्या, सीबीएसईच्या पेपर तपासणीतील अनागोंदीच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची यावेळी करण्यात येणार आहे. यासाठी नियोजनबद्ध पद्धतीनं जनआंदोलन उभारण्यात येत आहे. कॉकरोच पार्टीच्यावतीनं काही तरुणांची प्रवक्तेपदी नियुक्ती देखील करण्यात आली आहे. त्यांच्या मार्फत या पार्टीचा अजेंडा देखील माध्यमांच्या माध्यमातून जनतेसमोर मांडला जात आहे.दरम्यान, दिपके अमेरिकेतून थेट दिल्लीच्या आंतरराष्ट्रीय विमानतळावर उतरणार असल्यानं त्याचे समर्थक त्याचं विमानतळावर स्वागत करणार आहेत. पण अभिजीत दिपकेनं सत्ताधाऱ्यांना आपला पान 3 वर

# परळी शहराच्या हितासाठी भुयारी गटार योजनेची चौकशी व सरस्वती नदी संवर्धनाची मागणी-शिंदे, बागवाले



परळी वैजनाथ | प्रतिनिधी

परळी शहराचे मोठ्या प्रमाणात नुकसान करणाऱ्या भुयारी गटार योजनेच्या कामाची सखोल चौकशी करून संबंधित दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, तसेच सरस्वती नदीचे कॉँक्रिटीकरण तात्काळ थांबवून नदीचे नैसर्गिक स्वरुप जपण्यासाठी संपूर्ण स्वच्छता मोहीम राबविण्यात यावी, अशी मागणी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्याकडे शिवसेनेचे तालुकाप्रमुख तथा नगरसेवक व्यंकटेश शिंदे व राष्ट्रवादी कॉँग्रेसचे नगरसेवक नितीन बागवाले यांनी निवेदनाद्वारे करण्यात आली.

परळी नगर परिषद कार्यालयात जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांची भेट घेऊन शहरातील विविध समस्यांकडे लक्ष वेधण्यात आले. निवेदनात नमूद करण्यात आले की, भुयारी गटार योजनेच्या कामामुळे अनेक ठिकाणी रस्त्यांचे नुकसान झाले असून नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. या कामामध्ये झालेल्या त्रुटींची चौकशी करून जबाबदारांवर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली.

तसेच परळी शहरातून वाहणाऱ्या सरस्वती नदीचे कॉँक्रिटीकरण केल्यास नदीचे नैसर्गिक अस्तित्व धोक्यात येऊ शकते. पर्यावरण पान 3 वर

## महाराष्ट्र फक्त मराठ्यांसाठीच आहे का? मराठा समाजासाठी 8 योजनांची घोषणा होताच लक्ष्मण हाकेंचा सवाल



मराठा समाजासाठी राज्य सरकारने मोठा निर्णय घेतल आहे. आता ओबीसी समाजाप्रमाणे मराठा समाजालाही अनेक सवलती मिळणार आहेत. या सवलती शैक्षणिक आणि इतर महत्त्वाच्या बाबींबाबत असणार आहेत. मराठा समासाठी तब्बल 8 योजना सुरु केल्या जाणार आहेत. राज्यातील मराठा समाजाच्या लाखो विद्यार्थ्यांना याचा फायदा होणार आहे. सरकारच्या या निर्णयावर ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी आपली पान 3 वर

## नंदागौळ येथील रहिवासी | पुण्यात घरगुत्ती गॅसचा भीषण स्फोट

### नंदागौळ येथील तिघांचा मृत्यू,बालिकेसह दोघे जखमी



माहिती अशी की, नंदागौळ येथील रहिवासी व सध्या पुणे येथे खराडी परिसरात वास्तव्यास असलेल्या एका कुटुंबातील तिघांचा दूर्दैवी मृत्यू झाला आहे. तर यात एका बालिकेसह दोघी जखमी आहेत. या दुर्घटनेमुळे नंदागौळ गावावर असलेले विष्णू मुंजाजी गित्ते पान 3 वर

### परळी रेल्वे विकास समितीकडून विविध मागण्याचे दिले जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

# जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांना निवेदन देतांना सत्यनारायण दुबे कैलास तांदळे उपस्थित



परळी वैजनाथ ,(प्रतिनिधी) :- परळी वैजनाथ व बीड जिल्ह्यातील नागरिकांच्या रेल्वे सुविधा, पायाभूत विकास आणि पर्यटनवृद्धीच्या विविध मागण्यांसंदर्भात परळी रेल्वे विकास समितीच्या वतीने जिल्हाधिकारी बीड यांना सविस्तर निवेदन सादर करण्यात आले. दरम्यान जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांना निवेदन देतांना सत्यनारायण दुबे कैलास तांदळे उपस्थित होते. तसेच सविस्तर चर्चा करण्यात आली. जिल्हाधिकारी यांनी पुढील कार्यवाहीसाठी पुढे पाठवून देतो असे आश्वासन दिलं.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, परळी वैजनाथ रेल्वे स्थानकाला शंभर वर्षांहून अधिक इतिहास असून दक्षिण मध्य रेल्वेतील सिकंदराबादनंतर सर्वाधिक महसूल देणाऱ्या पान 3 वर

## पै. सुमितकुमार भारस्कर यांची आशियाई कुस्ती अजिंक्यपद स्पर्धेसाठी भारतीय संघात निवड



माजलगाव : थायलंड येथे 26 जून ते 5 जुलै 2026 या कालावधीत होणाऱ्या 20 वर्षांखालील आशियाई कुस्ती अजिंक्यपद स्पर्धेसाठी भारतीय संघात पै. सुमितकुमार भारस्कर यांची निवड झाली आहे. ही निवड त्यांच्या उल्लेखनीय कामगिरीमुळे झाल्याने माजलगावसह संपूर्ण जिल्ह्यात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. भारतीय कुस्ती महासंघाच्या वतीने 2 जून 2026 रोजी भारतीय खेळ प्राधिकरण (SAI) प्रशिक्षण केंद्र, लखनऊ (उत्तर प्रदेश) येथे राष्ट्रीय संघाच्या निवड चाचणीचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत मारुंजी येथील अमोल बुचडे कुस्ती अकादमीचा खेळाडू पै. सुमितकुमार भारस्कर याने 70 किलो वजनी गटातील फ्रीस्टाइल प्रकारात उत्कृष्ट कामगिरी करत भारतीय संघातील आपले स्थान निश्चित केले. निवड चाचणीच्या पान 3 वर

# उस्मानाबाद-लातूर-बीड विधानपरिषद :

### बसवराज पाटील विरुद्ध महेश देशमुख यांच्यात थेट लढत, सगळ्याच अपक्षांची माघार




धाराशिव : उस्मानाबाद-लातूर-बीड विधानपरिषद मतदारसंघात आता थेट भाजप विरुद्ध कॉँग्रेस, अशी दुरंगी लढत होणार आहे. अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या तासात सर्वच सातही अपक्षांनी आपले अर्ज काढून घेतल्याने अपेक्षेनुरूप मतदारसंघात थेट लढत रंगणार आहे उस्मानाबाद-लातूर-बीड मतदारसंघासाठी भाजपकडून माजी राज्यमंत्री बसवराज पाटील, कॉँग्रेसकडून जि.प. सदस्य महेश देशमुख हे रिंगणात उतरले आहेत. त्यांच्यासोबतच पान 3 वर

# सोपान काका मंदिर परिसरातील 15 फुटांचा अतिक्रमित रस्ता खुला करण्याची मागणी


### अन्यथा आमरण उपोषणाचा इशारा



परळी वैजनाथ | प्रतिनिधी परळी शहरातील मध्यवर्ती भागात असलेल्या जगमित्र नागा मंदिराच्या मागील बाजूस, सोपान काका मंदिर परिसरातील 15 फुटांचा रस्ता अतिक्रमणामुळे पूर्णपणे बंद झाल्याचा आरोप करत हा रस्ता तात्काळ खुला करण्यात यावा, अशी मागणी साहेबराव फड यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी तथा नगराध्यक्ष यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, संबंधित रस्ता बंद झाल्यामुळे परिसरातील नागरिकांना दैनंदिन ये-जा करण्यास तसेच वाहतुकीस मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. हा रस्ता खरेदीखतामध्ये नमूद असून दक्षिण बाजूस 15 फुटांचा रस्ता असल्याचे स्पष्ट आहे. त्यासंदर्भातील अधिकृत नकाशाही उपलब्ध असल्याचा दावा करण्यात आला आहे. पान 3 वर

## नीट परीक्षेत पुणे, लातूर केंद्रावर विशेष लक्ष ठेवा; मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आदेश



मुंबई: 'राष्ट्रीय पात्रता व प्रवेश परीक्षा' (नीट) देणाऱ्या राज्यातील विद्यार्थ्यांसाठी पारदर्शक आणि तणावरहित वातावरण असावे. सर्व यंत्रणांनी सतर्क राहून परीक्षा केंद्रांवर आवश्यक उपाययोजना करून कोणत्याही प्रकारचा गैरप्रकार होऊ नये, यासाठी अधिक दक्षता घ्यावी. पुणे आणि लातूर केंद्रावर विशेष लक्ष केंद्रीत करण्याचे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी दिले.

नीट परीक्षेच्या पूर्व तयारीसंदर्भात आयोजित पान 3 वर

# मातंग समाजासाठी स्वतंत्र स्मशानभूमी व रस्त्याची मागणी

**• सागरताई इचके यांचे तहसीलदारांना निवेदन; प्रश्न न सुटल्यास उपोषणाचा इशारा**



वडवणी | प्रतिनिधी वडवणी तालुक्यातील मौजे उपळी येथील मातंग समाजासाठी स्वतंत्र स्मशानभूमी उपलब्ध करून देण्यात यावी तसेच स्मशानभूमीकडे जाणारा अतिक्रमित रस्ता तात्काळ मोकळा करण्यात यावा, या मागणीसाठी मानवी हक्क अभियानच्या महिला तालुकाध्यक्ष सागरताई इचके यांनी वडवणी तहसीलदारांना निवेदन सादर केले आहे.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, उपळी येथील मातंग समाजाला अंत्यसंस्कारासाठी स्वतंत्र स्मशानभूमी नसल्याने नागरिकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. सध्या अंत्यसंस्कारासाठी वापरली जाणारी जागा नदीकाठी असल्याने पावसाळ्यात नदीला पूर आल्यास त्या ठिकाणी जाणे धोकादायक ठरते. त्यामुळे मृत व्यक्तींच्या अंत्यसंस्कारावेळी नातेवाईक व ग्रामस्थांना मोठ्या गैरसोयींना सामोरे जावे लागते.

याशिवाय स्मशानभूमीकडे जाणारा जुना पांदण रस्ता काही व्यक्तींनी अतिक्रमण करून बंद केल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. त्यामुळे अंत्ययात्रा नेण्यासाठीही गंभीर अडथळे निर्माण होत असून नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

स्मशानभूमी परिसरात पिण्याचे पाणी, बसण्याची व्यवस्था, संरक्षणासाठी शेड तसेच इतर मूलभूत सुविधांचा अभाव असल्याने अंत्यसंस्कारासाठी येणाऱ्या नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

मातंग समाजासाठी स्वतंत्र स्मशानभूमीस शासनमान्यता देऊन आवश्यक विकासकामांसाठी निधी उपलब्ध करून द्यावा, अतिक्रमणामुळे बंद झालेला रस्ता तात्काळ खुला करावा तसेच स्मशानभूमी परिसरात सर्व आवश्यक सुविधा उभाराव्यात, अशी मागणी सागरताई इचके यांनी प्रशासनाकडे केली आहे.

हा प्रश्न सामाजिक व मानवी दृष्टिकोनातून अत्यंत संवेदनशील असून प्रशासनाने तातडीने सकारात्मक कार्यवाही करावी, अशी अपेक्षा व्यक्त करताना सागरताई इचके यांनी प्रश्न मार्गी न लागल्यास उपोषणाचा मार्ग स्वीकारण्याचा इशाराही दिला आहे.

यावेळी मानवी हक्क अभियानचे जिल्हाध्यक्ष विष्णू मुजमुले, तालुकाध्यक्ष बालाजी इचके, राजू राऊत, दत्ता इचके, लक्ष्मण पाटोळे,शहादेव जाधव आणि अक्षय जाधव उपस्थित होते.

परळी संघर्षनेता

9881265102

प्रतिनिधी नेमणे आहे

बीड,आष्टी,पाटोदा,गेवराई

,धर्मापुरी

या तालुक्यात व गावात लोकप्रिय परळी संघर्षनेता या वर्तमान पत्र करिता अनुभवी प्रतिनिधी नेमणे आहे.

-:त्वरित संपर्क करा:-

9881265102

# शिवराज्याभिषेक : स्वराज्याच्या सार्वभौमतेचा सुवर्णक्षण

- डॉ. राजेंद्र बगाटे



भारतीय इतिहासात काही घटना अशा आहेत की ज्यांचे महत्त्व केवळ त्या काळापुरते मर्यादित राहत नाही, तर त्या पुढील अनेक पिढ्यांना प्रेरणा देत राहतात. अशा घटनांपैकी एक अत्यंत महत्त्वाची आणि गौरवशाली घटना म्हणजे छत्रपती छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक होय. 6 जून 1674 रोजी रायगडाच्या पवित्र भूमीवर संपन्न झालेला हा सोहळा केवळ एका राजाच्या सिंहासनारोहणाचा कार्यक्रम नव्हता, तर तो हिंदवी स्वराज्याच्या सार्वभौमतेची जगासमोर झालेली अधिकृत घोषणा होती. या ऐतिहासिक प्रसंगाने महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक इतिहासाला नवे वळण दिले. अनेक शतकांपासून परकीय सत्तांच्या अधिपत्याखाली असलेल्या जनतेच्या मनात स्वाभिमान, आत्मविश्वास आणि स्वातंत्र्याची ज्योत प्रज्वलित करणारा हा क्षण होता. म्हणूनच 6 जून हा दिवस महाराष्ट्रासाठी आणि संपूर्ण भारतासाठी अभिमानाचा, प्रेरणेचा आणि राष्ट्रभक्तीचा दिवस मानला जातो.

सतराव्या शतकातील भारताचा इतिहास पाहिला तर देशाची राजकीय परिस्थिती अत्यंत गुंतागुंतीची होती. दिल्लीतील मुघल सत्ता विस्ताराच्या शिखरावर होती. दक्षिणेत आदिलशाही, निजामशाही, कुतुबशाही यांसारख्या विविध सत्तांचे वर्चस्व होते. सामान्य जनता करांचा बोजा, अन्याय, अत्याचार आणि असुरक्षिततेच्या वातावरणात जीवन जगत होती. समाजामध्ये निराशा आणि परावलंबित्वाची भावना वाढीस लागली होती. अशा वेळी महाराष्ट्राच्या मातीत एक असे व्यक्तिमत्त्व उदयास आले ज्याने स्वराज्याचे स्वप्न पाहिले आणि ते प्रत्यक्षात साकार करून दाखविले. 19 फेब्रुवारी 1630 रोजी शिवनेरी किल्ल्यावर जन्मलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांना माता जिजाऊंनी रामायण, महाभारत आणि भारतीय संस्कृतीतील आदर्शांचे संस्कार दिले. अन्यायाविरुद्ध लढण्याची आणि दुर्बलांचे रक्षण करण्याची प्रेरणा बालपणापासूनच त्यांच्या मनात रुजली.

छत्रपती शिवाजी महाराजांनी अत्यंत लहान वयात स्वराज्य उभारणीचा संकल्प केला. त्या काळात स्वतंत्र राज्य निर्माण करणे ही अत्यंत कठीण गोष्ट होती. परंतु दृढनिश्चय, धाडस आणि जनतेवरील विश्वास यांच्या बळावर त्यांनी स्वराज्याचा पाया रचला. तोरणा किल्ला जिंकून त्यांनी स्वराज्याच्या स्थापनेची पहिली पायरी गाठली. त्यानंतर राजगड, पुरंदर, कोंढाणा, प्रतापगड, जावळी यांसारख्या अनेक प्रदेशांवर स्वराज्याचा झेंडा फडकला. अफजलखानाचा वध, शाहिस्तेखानावरील धाडसी हल्ला, सुरतेवरील मोहीम आणि आग्र्याहून केलेली थरारक सुटका या घटनांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाची कीर्ती संपूर्ण भारतभर पसरली. त्यांनी केवळ युद्धे जिंकली नाहीत, तर लोकांच्या मनात स्वराज्याची भावना निर्माण केली.



छत्रपती शिवाजी महाराजांनी उभारलेले स्वराज्य प्रत्यक्षात स्वतंत्र होते. तथापि, त्या काळातील राजकीय आणि सामाजिक व्यवस्थेनुसार राज्यकर्त्याला सार्वभौम शासक म्हणून अधिकृत मान्यता मिळण्यासाठी राज्याभिषेक आवश्यक मानला जात असे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या विरोधकांकडून त्यांच्या क्षत्रियत्वाबाबत प्रश्न उपस्थित केले जात होते. तसेच स्वराज्याला स्वतंत्र राजकीय अस्तित्व प्राप्त झाले असले तरी त्याला अधिकृत स्वरुप देणे गरजेचे होते. त्यामुळे राज्याभिषेकाचा निर्णय घेण्यात आला. हा निर्णय केवळ धार्मिक नव्हता, तर तो राजकीय दृष्ट्याही अत्यंत महत्त्वाचा होता. राज्याभिषेकामुळे स्वराज्य हे कोणत्याही सुलतानाच्या किंवा बादशहाच्या अधिपत्याखाली नसून स्वतंत्र आणि सार्वभौम राज्य असल्याचे जगाला जाहीर होणार होते.

राज्याभिषेकाच्या तयारीसाठी मोठ्या प्रमाणावर नियोजन करण्यात आले. रायगड किल्ला सजविण्यात आला. संपूर्ण स्वराज्यात आनंदाचे वातावरण निर्माण झाले. देशभरातील विद्वान, संत, पंडित, सरदार आणि मान्यवरांना निमंत्रित करण्यात आले. काशीचे प्रसिद्ध वेदपंडित गागाभट्ट यांना राज्याभिषेक विधीचे प्रमुख म्हणून आमंत्रित करण्यात आले. त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या वंशावळीचा अभ्यास करून त्यांना क्षत्रिय असल्याचे प्रमाणित केले. त्यामुळे राज्याभिषेकास धार्मिक आणि सामाजिक मान्यता प्राप्त झाली.

राज्याभिषेकासाठी अनेक दिवस यज्ञ, हवन, पूजा आणि धार्मिक विधी सुरु होते. रायगडावर हजारो लोक जमले होते. प्रत्येकाच्या मनात उत्सुकता आणि अभिमानाची भावना होती. अनेक वर्षांच्या संघर्षानंतर स्वराज्याला अधिकृत स्वरुप प्राप्त होणार होते.

6 जून 1674 रोजी पहाटे राज्याभिषेकाचा मुख्य सोहळा पार पडला. त्यानंतर सुवर्णसिंहासनावर त्यांना विराजमान करण्यात आले. त्या क्षणी रायगडाच्या भूमीवर इतिहास घडत होता. अनेक शतकांनंतर भारतीय भूमीवर एका स्वतंत्र हिंदवी राज्याच्या सार्वभौम राजाचा राज्याभिषेक होत होता. हा क्षण महाराष्ट्राच्या इतिहासातील सर्वात अभिमानास्पद क्षणांपैकी एक मानला जातो.

राज्याभिषेकामुळे छत्रपती शिवाजी महाराजांना धार्मिक, सामाजिक आणि राजकीय मान्यता मिळाली. त्यांच्या सत्तेला वैधानिक स्वरुप प्राप्त झाले. स्वराज्याचा स्वतंत्र शासक म्हणून त्यांची ओळख निर्माण झाली. याच वेळी स्वतंत्र राजमुद्रा स्वीकारण्यात आली. राजमुद्रेवरील श्लोक स्वराज्याच्या तत्त्वज्ञानाचे प्रतीक होता. प्रतिपदेच्या चंद्रकोरीप्रमाणे वाढणारे आणि लोककल्याणासाठी कार्य करणारे राज्य ही त्यामागील संकल्पना होती.

राज्याभिषेकानंतर छत्रपती शिवाजी महाराजांनी प्रशासन अधिक मजबूत केले. अष्टप्रधान मंडळाची रचना अधिक प्रभावीपणे कार्यरत झाली. पेशवा, अमात्य, सचिव, मंत्री, सुमंत, सेनापती, न्यायाधीश आणि पंडितराव या आठ प्रमुख पदांमार्फत राज्यकारभार चालविला जात होता. प्रत्येक विभागाची स्पष्ट जबाबदारी निश्चित करण्यात आली होती. शासनातील पारदर्शकता, कार्यक्षमता आणि उत्तरदायित्व यांना प्राधान्य देण्यात आले. त्यामुळे स्वराज्याची प्रशासनव्यवस्था त्या काळातील इतर राज्यांच्या तुलनेत अधिक प्रभावी ठरली.

छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्यकारभार लोककल्याणकारी होता. त्यांनी शेतकऱ्यांच्या हिताचे रक्षण केले. जमिनीचे मोजमाप करून न्याय्य महसूल पद्धती लागू केली. शेतकऱ्यांवर अतिरिक्त करांचा भार टाकला गेला नाही. दुष्काळ किंवा संकटाच्या काळात त्यांना मदत पुरविण्यात आली. त्यामुळे स्वराज्यातील कृषीव्यवस्था मजबूत झाली. जनतेच्या कल्याणासाठी शासन असावे, ही त्यांची भूमिका होती. म्हणूनच छत्रपती शिवाजी महाराजांना “रयतेचा राजा” असे संबोधले जाते.

स्त्रियांच्या सन्मानाचे रक्षण हे छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्यकारभाराचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य होते. युद्धात शत्रूपक्षातील स्त्रियांनाही सन्मानाने वागणूक दिली जात असे. महिलांवर अत्याचार करणाऱ्यांना कठोर शिक्षा दिली जात होती. त्या काळात स्त्रियांच्या सुरक्षेला विशेष महत्त्व देणारा असा दृष्टिकोन अत्यंत दुर्मीळ होता. त्यामुळे छत्रपती शिवाजी महाराजांचा स्त्रीविषयक दृष्टिकोन आधुनिक आणि प्रगत मानला जातो.

धार्मिक सहिष्णुता हे छत्रपती शिवाजी महाराजांच्या व्यक्तिमत्त्वाचे आणखी एक वैशिष्ट्य होते. त्यांनी कोणत्याही धर्माचा द्वेष केला नाही. त्यांच्या सैन्यात आणि प्रशासनात विविध धर्मांचे लोक कार्यरत होते. मशिदी, दर्गे आणि मुस्लिम धर्मीयांच्या धार्मिक स्थळांचे संरक्षण करण्यात आले. त्यांचा संघर्ष कोणत्याही धर्माविरुद्ध नव्हता, तर अन्यायकारक आणि अत्याचारी सत्तेविरुद्ध होता. त्यामुळे स्वराज्य हे सर्वधर्मसमभाव आणि न्याय यांवर आधारित होते.

छत्रपती शिवाजी महाराजांनी संरक्षणव्यवस्थेतही अनेक महत्त्वपूर्ण सुधारणा केल्या. त्यांनी किल्ल्यांचे सशक्त जाळे उभारले. प्रत्येक किल्ल्याचे सामरिक महत्त्व लक्षात घेऊन त्यांचा विकास केला. गनिमी कावा ही युद्धपद्धती प्रभावीपणे वापरून त्यांनी बलाढ्य शत्रूंना पराभूत केले. त्यांचे सैन्य शिस्तबद्ध, प्रशिक्षित आणि निष्ठावान होते. याशिवाय त्यांनी सागरी सुरक्षेलाही विशेष महत्त्व दिले. सिंधुदुर्ग, विजयदुर्ग आणि सुवर्णदुर्ग यांसारखे जलदुर्ग बांधून त्यांनी आरमाराची उभारणी केली. भारतीय इतिहासात सशक्त नौदल निर्माण करणाऱ्या शासकांमध्ये त्यांचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते.

राज्याभिषेकामुळे स्वराज्याला नवीन ऊर्जा प्राप्त झाली. मराठा साम्राज्याच्या विस्ताराला गती मिळाली. पुढील काळात मराठा सत्ता महाराष्ट्राबाहेरही विस्तारली. स्वराज्याची संकल्पना संपूर्ण भारतात पोहोचली. अनेकांना अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची प्रेरणा मिळाली. त्यामुळे शिवराज्याभिषेक हा केवळ महाराष्ट्राच्या इतिहासातील नव्हे, तर भारतीय राष्ट्रचेतनेच्या इतिहासातीलही एक महत्त्वाचा टप्पा मानला जातो.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाचा सांस्कृतिक प्रभावही मोठा होता. मराठी भाषा, साहित्य, कला आणि संस्कृतीला नवसंजीवनी मिळाली. प्रशासनात मराठी भाषेचा वापर वाढला. स्थानिक परंपरा आणि सांस्कृतिक मूल्यांना प्रोत्साहन मिळाले. स्वराज्याच्या स्थापनेमुळे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक अस्मितेला नवे बळ प्राप्त झाले. आजही महाराष्ट्रातील लोकजीवनात छत्रपती शिवाजी महाराजांचे स्थान अत्यंत आदराचे आहे.

आधुनिक काळात शिवराज्याभिषेक दिनाचे महत्त्व अधिक व्यापक झाले आहे. आज भारत एक लोकशाही राष्ट्र आहे. लोकशाहीतील अनेक मूल्ये जसे की सुशासन, लोककल्याण, न्याय, समानता आणि उत्तरदायित्व यांची झलक छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्यात दिसून येते. त्यांनी दाखविलेला आदर्श आजच्या प्रशासकांसाठी, राजकारण्यांसाठी आणि समाजनेत्यांसाठी मार्गदर्शक ठरू शकतो. भ्रष्टाचारमुक्त प्रशासन, स्त्रियांचा सन्मान, सामाजिक समता आणि राष्ट्रीय एकात्मता यांसारख्या मूल्यांची आजही समाजाला गरज आहे.

दरवर्षी 6 जून रोजी महाराष्ट्रासह देशभरात शिवराज्याभिषेक दिन उत्साहात साजरा केला जातो. रायगडावर विशेष सोहळ्यांचे आयोजन केले जाते. हजारो शिवभक्त, इतिहासप्रेमी आणि पर्यटक रायगडावर जाऊन महाराजांना अभिवादन करतात. विविध ठिकाणी व्याख्याने, प्रदर्शन, पोवाडे, सांस्कृतिक कार्यक्रम आणि ऐतिहासिक मिरवणुका आयोजित केल्या जातात. या माध्यमातून नव्या पिढीपर्यंत शिवचरित्र पोहोचविण्याचे कार्य केले जाते.

आजच्या युवकांसाठी शिवराज्याभिषेक दिन विशेष प्रेरणादायी आहे. नेतृत्व, संघटनकौशल्य, धैर्य, दूरदृष्टी, प्रामाणिकपणा आणि राष्ट्रनिष्ठा या गुणांचे महत्त्व छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनातून शिकता येते. त्यांनी प्रतिकूल परिस्थितीतही हार मानली नाही. संकटांना संधीमध्ये बदलून त्यांनी स्वराज्याची उभारणी केली. हीच प्रेरणा आजच्या तरुणांना जीवनातील आव्हानांचा सामना करण्यासाठी उपयोगी ठरू शकते.

छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्य केवळ ऐतिहासिक गौरवापुरते मर्यादित नाही. त्यांच्या विचारांमध्ये आधुनिक समाजासाठीही मार्गदर्शन आहे. समाजातील दुर्बल घटकांचे संरक्षण, स्त्रियांचा सन्मान, पर्यावरणाबाबत जागरूकता, न्यायनिष्ठ प्रशासन आणि राष्ट्रहिताला सर्वोच्च प्राधान्य देणे ही त्यांची शिकवण आजही तितकीच उपयुक्त आहे. म्हणूनच छत्रपती शिवाजी महाराजांना केवळ इतिहासातील महान राजा म्हणून नव्हे, तर एक आदर्श राष्ट्रपुरुष म्हणून स्मरण केले जाते.

छत्रपती छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक हा भारतीय इतिहासातील स्वाभिमान, स्वातंत्र्य आणि लोककल्याण यांचा विजय होता. रायगडावरील त्या सुवर्णक्षणाने महाराष्ट्राला सार्वभौम नेतृत्व दिले, जनतेला आत्मविश्वास दिला आणि भारतीय इतिहासाला नवी दिशा दिली. 6 जून हा दिवस आपल्याला केवळ भूतकाळातील वैभवाची आठवण करून देत नाही, तर वर्तमान आणि भविष्य घडविण्यासाठी आवश्यक असलेल्या मूल्यांची जाणीवही करून देतो.

शिवराज्याभिषेक दिनानिमित्त आपण छत्रपती छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याला, त्यांच्या अद्वितीय नेतृत्वाला आणि स्वराज्याच्या महान संकल्पनेला अभिवादन करतो. स्वाभिमान, न्याय, लोककल्याण, राष्ट्रप्रेम आणि सर्वधर्मसमभाव या मूल्यांचे जतन करूनच आपण त्यांच्या कार्याचा खरा वारसा पुढे नेऊ शकतो. रायगडावर झालेला राज्याभिषेक हा इतिहासातील एक प्रसंग असला, तरी त्यातून मिळणारी प्रेरणा चिरंतन आहे. जोपर्यंत स्वराज्य, स्वातंत्र्य आणि न्याय या मूल्यांवर मानवाचा विश्वास राहील, तोपर्यंत छत्रपती छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक आणि त्यांचा तेजस्वी वारसा भारतीय जनमानसात अजरामर राहील.

***डॉ. राजेंद्र बगाटे (लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)*, ईमेल - bagate.rajendra5@**

# शेतकरी कर्जमाफीचा निर्णय : स्वागत, अपेक्षा आणि वास्तव

डॉ. भारत कऱ्हाड



गेल्या अनेक महिन्यांपासून शेतकरी कर्जमाफीच्या निर्णयाची चर्चा सुरु होती. शासनाकडून विविध स्तरांवर अभ्यास सुरु असल्याचे सांगितले जात होते. आर्थिक परिणाम, लाभार्थ्यांची संख्या, पात्रतेचे निकष, बँकिंग यंत्रणेची तयारी आणि राज्याच्या आर्थिक क्षमतेचा विचार करून निर्णय घेतला जाईल, असे वारंवार स्पष्ट करण्यात येत होते. त्यामुळे प्रत्येक मंत्रिमंडळ बैठकीकडे, प्रत्येक अधिकृत निवेदनाकडे आणि प्रत्येक बातमीकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागून राहिले होते. अखेर महाराष्ट्र शासनाने “पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना 2026” संदर्भातील शासन निर्णय जारी करून या प्रदीर्घ प्रतीक्षेला पूर्णविराम दिला आहे.

भारतीय अर्थव्यवस्थेचा पाया मानल्या जाणाऱ्या कृषी क्षेत्रासमोर गेल्या काही वर्षांत अनेक गंभीर आव्हाने उभी राहिली आहेत. हवामानातील अनिश्चितता, दुष्काळ, अतिवृष्टी, अवकाळी पाऊस, गारपीट, वाढता उत्पादन खर्च, मजुरीचे वाढते दर, बियाणे आणि खतांच्या किंमतीतील वाढ तसेच बाजारभावातील चढ-उतार यामुळे अनेक शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले. अनेकांनी पीककर्ज घेतले; मात्र नैसर्गिक आणि आर्थिक संकटांमुळे कर्जाची परतफेड वेळेत करणे शक्य झाले नाही. परिणामी अनेक शेतकरी बँकिंग व्यवस्थेपासून दूर गेले, तर काहींवर थकीत कर्जाचा ताण वाढत गेला. अशा परिस्थितीत कर्जमाफीची मागणी सातत्याने होत होती आणि शासनाच्या निर्णयाकडे मोठ्या अपेक्षेने पाहिले जात होते.

उपलब्ध माहितीनुसार या योजनेअंतर्गत पात्र शेतकऱ्यांच्या दोन लाख रुपयांपर्यंतच्या थकीत पीककर्जाची माफी करण्यात येणार आहे. नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांसाठीही प्रोत्साहनपर लाभाची तरतूद करण्यात आली आहे. राज्यातील लाखो शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. यासाठी शासनाला मोठ्या प्रमाणावर आर्थिक तरतूद करावी लागणार आहे. यावरून राज्य शासनाने कृषी क्षेत्रातील अडचणी गांभीर्याने घेतल्याचे दिसून येते. आर्थिक भार स्वीकारूनही शेतकऱ्यांना दिलासा देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे, ही बाब निश्चितच महत्त्वाची आहे.

या निर्णयाचे स्वागत होण्यामागे अनेक कारणे आहेत. कर्जमाफी हा सर्व समस्यांवरील कायमस्वरूपी उपाय नसला तरी संकटग्रस्त शेतकऱ्यांसाठी तो महत्त्वाचा आधार ठरू शकतो. थकीत कर्जामुळे अनेक शेतकऱ्यांना नव्याने कर्ज मिळण्यात अडचणी येतात. शेतीसाठी आवश्यक भांडवल उभारणे कठीण होते. आर्थिक व्यवहारांवर मर्यादा येतात. अशा परिस्थितीत कर्जमाफीमुळे त्यांना नव्याने सुरुवात करण्याची संधी मिळू शकते. ग्रामीण अर्थव्यवस्थेलाही या निर्णयाचा सकारात्मक परिणाम होण्याची शक्यता आहे. शेतकऱ्यांच्या हातात काही प्रमाणात आर्थिक सक्षमता निर्माण झाल्यास बियाणे, खते, शेती अवजारे, कृषी सेवा आणि इतर पूरक व्यवसायांनाही चालना मिळू शकते.

तथापि, कोणत्याही मोठ्या धोरणात्मक निर्णयाप्रमाणे या योजनेबाबतही काही प्रश्न उपस्थित होत आहेत. काही शेतकरी संघटनांच्या मते दोन लाख रुपयांची मर्यादा अपुरी आहे. अनेक शेतकऱ्यांचे कर्ज यापेक्षा अधिक असल्यामुळे त्यांना पूर्ण दिलासा मिळणार नाही. काही ठिकाणी पात्रतेच्या निकषांबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत. कट-ऑफ तारखेच्या आधारे लाभ निश्चित केल्यामुळे काही शेतकरी योजनेपासून वंचित राहू शकतात, अशी भावना व्यक्त केली जात आहे. नियमितपणे कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांमध्येही मिश्र प्रतिक्रिया दिसून येतात. काहींच्या मते वेळेवर कर्जफेड करणाऱ्यांना अधिक प्रोत्साहन मिळायला हवे होते. त्यामुळे या निर्णयाचे स्वागत होत असतानाच काही विधायक सूचना आणि आक्षेपही पुढे येत आहेत.

काही कृषी अभ्यासक आणि अर्थतज्ज्ञ याकडे आणखी व्यापक दृष्टीकोनातून पाहतात. त्यांच्या मते कर्जमाफीमुळे तात्कालिक दिलासा मिळतो; परंतु शेतीसमोरील मूलभूत प्रश्न कायम राहतात. उत्पादन खर्च सातत्याने वाढत आहे, बाजारभावातील अस्थिरता कायम आहे, हवामान बदलाचे परिणाम तीव्र होत आहेत, सिंचन सुविधांमध्ये अजूनही असमानता आहे आणि अनेक भागांमध्ये साठवणूक व प्रक्रिया उद्योगांची कमतरता जाणवते. त्यामुळे कर्जमाफीबरोबरच हमीभाव, पीकविमा, जलव्यवस्थापन, मूल्यवर्धन उद्योग, निर्यात क्षमता आणि कृषी तंत्रज्ञानाचा वापर वाढविणे यांसारख्या दीर्घकालीन उपाययोजनांवरही भर देण्याची गरज आहे.

या निर्णयाच्या आर्थिक परिणामांवरही चर्चा होत आहे. हजारो कोटी रुपयांचा खर्च उचलताना शासनाला विकासकामे, शिक्षण, आरोग्य, पायाभूत सुविधा आणि इतर कल्याणकारी योजनांमध्ये संतुलन राखावे लागणार आहे. दुसरीकडे ग्रामीण भागात आर्थिक व्यवहारांना चालना मिळाल्यास त्याचा सकारात्मक परिणाम बाजारपेठेवर आणि स्थानिक अर्थव्यवस्थेवर होऊ शकतो. त्यामुळे या निर्णयाकडे केवळ खर्च म्हणून नव्हे, तर ग्रामीण अर्थव्यवस्थेला दिलेल्या प्रोत्साहनाच्या स्वरुपातही पाहिले जात आहे.

खरी परीक्षा मात्र आता अंमलबजावणीची आहे. शासन निर्णय जारी करणे हा महत्त्वाचा टप्पा असला तरी योजनेचे यश लाभार्थ्यांपर्यंत प्रत्यक्ष लाभ पोहोचण्यात आहे. पात्र लाभार्थ्यांची अचूक निवड, पारदर्शक प्रक्रिया, बँकांशी प्रभावी समन्वय, तांत्रिक अडचणींचे त्वरित निराकरण आणि लाभाचे वेळेत वितरण या बाबी अत्यंत महत्त्वाच्या ठरणार आहेत. पूर्वीच्या काही योजनांमध्ये लाभार्थी पडताळणी, कागदपत्रे आणि तांत्रिक प्रक्रियांमुळे अडचणी निर्माण झाल्या होत्या. त्यामुळे यावेळी अशा समस्या टाळण्यासाठी विशेष दक्षता घेणे आवश्यक आहे.आज शेतकऱ्यांच्या अपेक्षा घोषणांपेक्षा प्रत्यक्ष परिणामांच्या आहेत. शासनाने घेतलेल्या निर्णयाचा लाभ प्रत्येक पात्र शेतकऱ्यापर्यंत वेळेत आणि पारदर्शकपणे पोहोचला पाहिजे. त्याचबरोबर कृषी क्षेत्रातील मूलभूत समस्यांवर दीर्घकालीन उपाययोजना राबविण्याची प्रक्रिया देखील सातत्याने सुरु राहिली पाहिजे. कर्जमाफी हा शेवट नसून अधिक सक्षम आणि शाश्वत कृषी व्यवस्थेकडे जाणाऱ्या प्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा म्हणून त्याकडे पाहणे आवश्यक आहे.

खूप वाट पाहावी लागली, अनेक चर्चा झाल्या, विविध अंदाज बांधले गेले आणि अनेक प्रश्न विचारले गेले; परंतु अखेर महाराष्ट्र शासनाने शेतकरी कर्जमाफीचा शासन निर्णय जारी केला आहे. हा निर्णय लाखो शेतकरी कुटुंबांसाठी दिलासादायक ठरू शकतो. शासनाने शेतकऱ्यांच्या अडचणींकडे गांभीर्याने पाहून सकारात्मक भूमिका घेतल्याचे या निर्णयातून दिसून येते. त्याचवेळी या योजनेबाबत व्यक्त होत असलेल्या प्रश्नांकडे आणि सूचनांकडेही सकारात्मक दृष्टीने पाहणे आवश्यक आहे. लोकशाही व्यवस्थेत स्वागत आणि चिकित्सक विचार या दोन्ही गोष्टी महत्त्वाच्या असतात. कर्जमाफीचे स्वागत करतानाच तिची प्रभावी अंमलबजावणी आणि कृषी क्षेत्राच्या दीर्घकालीन विकासासाठी आवश्यक सुधारणा यांवरही तितकेच लक्ष दिले गेले तर हा निर्णय अधिक अर्थपूर्ण ठरेल. शेतकरी हा देशाचा अन्नदाता आहे. त्याच्या आर्थिक स्थैर्यासाठी, सन्मानासाठी आणि भविष्यासाठी शासन, समाज, वित्तीय संस्था आणि कृषी क्षेत्राशी संबंधित सर्व घटकांनी एकत्रितपणे प्रयत्न करणे हीच काळाची गरज आहे.

**डॉ. भारत कऱ्हाड, प्राचार्य, वराडकर महाविद्यालय दापोली, जिल्हा रत्नागिरी.**

**हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक मोहन भागुजीराव व्हावळे यांनी मातोश्री ऑफसेट मोंढा जवळ, परळी वैजनाथ, परळी ता. परळी, जि.बीड 431515 (महाराष्ट्र ) येथे छापून साप्ताहिक परळी संघर्षनेता, कार्यालय, मोहन भागुजीराव व्हावळे, इंदिरा नगर ता. परळी वैजनाथ जि.बीड पिन कोड 431515 (एम.एस.) येथे प्रकाशित केले आहे. मोबा. 9881265102, पीआरबी ॲक्ट नुसार या अंकातील प्रकाशित झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. या संबंधीत वाद परळी वैजनाथ न्यायालया अंतर्गत parlisangharshneta@gmail.com , mohanvhavale1111@gmail.com**

## पान 1 वरुन

प्रदीप जाधवर आदींसह भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.ना. पंकजाताई श्रीक्षेत्र पुरुषोत्तम पुरीला येणार असल्याने कार्यकर्त्यांनी माजलगांव ते पुरुषोत्तम पुरी दरम्यान त्यांच्या स्वागताचे जागोजागी मोठमोठे बॅनर लावले होते. माजलगांव, सावरगाव, किट्टी आडगाव, माळेगाव येथे वाहनाचा ताफा थांबवून ढोल ताशांच्या निनादात त्यांचे जल्लोषात स्वागत झाले. किट्टी आडगाव येथे विष्णू आगे या कार्यकर्त्यांकडे जावून त्यांनी त्याचे घरगुती स्वागत स्वीकारले. पंतप्रधान नरेंद्र मोदी सरकारला बारा वर्ष पूर्ण झाल्याबद्दल भाजपच्या वतीने सर्वत्र विविध उपक्रम राबविले जात आहेत, त्याचाच एक भाग म्हणून आज जागतिक पर्यावरण दिनानिमित्त युवा मोर्चाच्या वतीने किट्टी आडगाव येथे ना. पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

----------------------------------------

आज याबाबतचे आदेश जारी केले. त्यानुसार मराठा विद्यार्थ्यांना सर्व सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी शालेय शिक्षण व क्रिडा विभाग , उच्च व तंत्र शिक्षण विभाग , वैद्यकीय शिक्षण विभाग , कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय विकास विभाग, कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता विकास विभाग या विभागांच्या शैक्षणिक योजना, सवलती लागू करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. भविष्यात इतर मागास प्रवर्गास ज्या काही नवीन शैक्षणिक सवलती व सोयीसुविधा लागू करण्यात येतील, त्या सर्व सवलती पुढील कोणत्याही नवीन आदेशाची वाट न पाहता मराठा समाजास आपोआप लागू होतील, अशी अत्यंत महत्त्वाची तरतूदही या निर्णयात करण्यात आली आहे. या सवलती लागू करण्याबाबत कोणती कार्यवाही संबंधित विभागाकडून करण्यात आली याचा अहवालही मराठा आरक्षण मंत्रिमंडळ उपसमितीला द्यावा लागणार आहे.

------------------------------------

संतुलन राखण्यासाठी व नदी संवर्धनासाठी काँक्रिटीकरणाचा प्रस्ताव रद्द करून नदीपात्रातील गाळ, कचरा व अतिक्रमणे हटवून संपूर्ण स्वच्छता करण्यात यावी, अशीही मागणी निवेदनातून करण्यात आली.

या प्रसंगी शिवसेनेचे तालुकाप्रमुख तथा नगरसेवक व्यंकटेश शिंदे सहनगरसेवक नितीन बागवाले उपस्थित होते. शहराच्या विकासासोबतच पर्यावरण संरक्षणालाही प्राधान्य देण्याची गरज असल्याचे यावेळी प्रतिनिधींनी सांगितले.

“शहराच्या विकासाच्या नावाखाली नागरिकांचे नुकसान होऊ नये आणि सरस्वती नदीचे नैसर्गिक अस्तित्व कायम राहावे, यासाठी हा लढा सुरु राहील,” असे निवेदनकर्त्यांनी स्पष्ट केले.

----------------------------------------

प्रतिक्रिया दिली आहे. हाके नेमकं काय म्हणाले ते जाणून घेऊयात.मराठा समाजासाठी 8 योजना सुरु करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. यावर बोलताना लक्ष्मण हाके यांनी म्हटले की, ओबीसी समुदायातील योजनांना निधी नाही, ओबीसी महामंडळांना अध्यक्ष नाही. समाज कल्याण विभागाचा हजारो कोटी रुपयांचा निधी इतरत्र वळवला जातो. ओबीसी समुदायातील 18 महामंडळाची घोषणा निवडणुकीला सामोरे जाताना सरकारने केली होती.पण त्या 18 महामंडळाला साधा अध्यक्षही नाही आणि निधी सुद्धा नाही, कार्यालय नाही आणि शिपाई पण नाही. महाराष्ट्र म्हणजे फक्त मराठा समाजासाठीच आहे का?महाराष्ट्रातील मराठा समाजासाठी विद्यार्थ्यांना काही सवलती देणार असाल तर त्याचं स्वागत लक्ष्मण हाके करणार आहे. पण महा ज्योतीला जो निधी मिळतो तो सार्थीच्या तुलनेत किती मिळतो असा सवाल लक्ष्मण हाके यांनी उपस्थित केला. आठ लाख करोड रुपयांच्या बजेटमध्ये 50% हुन अधिक जास्त लोकसंख्येला म्हणजे ओबीसीला अर्धा टक्क्याची बजेटची तरतूद असावी. फडणवीस साहेब तुम्ही 12-13 करोड जनतेचे मुख्यमंत्री आहात, परंतु ओबीसींच्या मागण्यांना वाटाण्याच्या अक्षता मिळाल्यात. मराठा समाजाच्या वेगवेगळ्या मागण्यांना तुम्ही रेड कार्पेट आजही घालता, आम्हाला आजही तुम्ही सापत्न वागणूक देत आहात. आजही तुम्ही एससी एसटी आणि ओबीसी बांधवांवर अन्याय करत आहात, तुमच्या धोरणाचा आम्ही जाहीर निषेध करतो.मराठा समाजासाठी या योजना सुरु होणार

शालांत परिक्षोत्तर शिष्यवृत्ती योजनामोटार वाहन चालक व वाहक प्रशिक्षण योजनामाध्यमिक व उच्च माध्यमिक वर्गातील विद्यार्थ्यांना लागू असलेली शिष्यवृत्ती योजनाविद्यार्थ्यांना लागू असलेल्या इतर 16 बाबींबाबतची प्रतिपूर्ती करण्याबाबतची योजनामहाराष्ट्र राज्यातील रहिवासी असणारे व परराज्यात अनुदानित व विनाअनुदानित व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या उमेदवारांसाठी लागू असलेली योजनाओबीसी विद्यार्थ्यांना शैक्षणिक सवलती व सोयी सुविधा मिळण्यासाठी पात्र असलेल्या सर्व अभ्यासक्रमांसाठी आता मराठा समाजातील विद्यार्थी ही पात्र असतील.ओबीसी विद्यार्थ्यांनी केंद्रिभूत प्रवेश प्रक्रिया (CAP) पूर्ण झाल्यानंतर रिक्त राहिलेल्या जागांवर प्रवेश नियंत्रण समितीने मान्यता दिलेल्या संस्थास्तरावर प्रवेश घेतलेल्या इतर मागास वर्ग प्रवर्गातील विद्यार्थ्यांप्रमाणे मराठा समाजातील विद्यार्थ्यांना देखील शैक्षणिक सवलती लागू करण्यात याव्यात.ज्या शैक्षणिक सवलती व सोयी-सुविधा इतर मागास प्रवर्गास लागू करण्यात आल्या असतील अथवा भविष्यात लागू करण्यात येतील, त्या सर्व शैक्षणिक सवलती व सोयी-सुविधा पुढील आदेशापर्यंत मराठा समाजास आपोआप लागू होतील.

--------------------------------------

यांच्या पुण्यातील घरी आज दिनांक 5 जून रोजी सकाळी 9.30 वाजण्याचे सुमारास घरातील स्वयंपाकांच्या गॅसची अचानक गळती होऊन मोठा स्फोट झाला. स्फोटात पांडुरंग विष्णू गित्ते (वय 35 वर्षे) यांचा जागीच मृत्यू झाला. तर विष्णू मुंजाजी गित्ते (वय - 62 वर्ष), त्यांची पत्नी सौ. वृंदावणी विष्णु गित्ते (वय 58 वर्षे) यांना गंभीर जखमी अवस्थेत पुणे येथील ससून हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. तेथे उपचार सुरू असताना त्यांच्या मृत्यू झाला. या स्फोटात कु. नहारिका गित्ते (वय 5 वर्षे), सौ. राजश्री पांडुरंग गित्ते (वय 25 वर्षे) जखमी झाल्या असून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू असल्याचे नातेवाईकांनी सांगितले.पुण्यात घरगुती गॅसचा स्फोट होऊन नंदागवळ येथील एकाच कुटुंबाती विष्णू मुंजाजी गित्ते, सौ. वृंदावणी विष्णु गित्ते, पांडुरंग विष्णु गित्ते या तिघांचे निधन झाल्याची घटना समजतात नंदागौळ गावावर शोककळा पसरली. गिते कुटुंबावर दु:खाचा डोंगर कोसळला. दिवसभर गावामध्ये या एकाच घटनेची चर्चा ऐकावयास मिळत होती. घरगुती गॅसच्या स्फोटामध्ये पुणे येथे निधन झालेल्या नंदागौळ येथील एकाच कुटुंबातील तिघांच्या पार्थिवावर उद्या शनिवार दिनांक 6 जून रोजी सकाळी नंदागौळ येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार असल्याची माहिती त्यांच्या नातेवाईकांकडून देण्यात आली.

----------------------------------------

स्थानकांपैकी एक असूनही या भागाकडे विकासाच्या दृष्टीने दुर्लक्ष झाले आहे. त्यामुळे परळी जंक्शनचा समावेश मध्य रेल्वेमध्ये करण्यात यावा, अशी प्रमुख मागणी करण्यात आली आहे. परळी येथे पिट लाईन मंजूर करून नवीन गाड्या सुरु करण्यासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. तसेच बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या श्री वैद्यनाथ मंदिरात दरवर्षी लाखो भाविक येत असल्याने रेल्वे स्थानकावर यात्रेकरु व पर्यटक माहिती केंद्र सुरु करावे, अशी मागणीही करण्यात आली आहे. सध्या सुरु असलेल्या काही रेल्वे गाड्यांचा विस्तार परळीपर्यंत करण्यात यावा. मुंबई-लातूर एक्सप्रेस, मचीलीपट्टणम- बिदर एक्सप्रेस आणि हैदराबाद-बिदर इंटरसिटी या गाड्या परळी वैजनाथपर्यंत वाढविण्याची मागणी निवेदनात करण्यात आली आहे. याशिवाय चार ज्योतिर्लिंगांना जोडणारी ‘ज्योतिर्लिंग एक्सप्रेस’, सिकंदराबाद-जम्मू तवी, कन्याकुमारी-उधमपूर, रामेश्वरम-ओखा तसेच हैदराबाद-अजमेर या नव्या रेल्वे सेवांचा प्रारंभ परळी मार्गे करण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. पुणे, मुंबई आणि हैदराबादसाठी वंदे भारत एक्सप्रेस सुरु करण्याचाही प्रस्ताव देण्यात आला आहे. कोल्हापूर-नागपूर आणि कोल्हापूर- धनबाद या रेल्वे गाड्या सध्या आठवड्यातून मर्यादित दिवस धावतात. त्या दररोज सुरु करण्यात याव्यात, अशी मागणी समितीने केली आहे. शहरातील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी जालालपूर परिसरात नवीन रेल्वे उड्डाणपूल (ROB), पांडे फार्म परिसरात आणि शिवाजीनगर भागात अंडरपास उभारण्यात यावेत. तसेच मानवत रोड-परळी वैजनाथ रेल्वे मार्गासाठी विशेष निधी मंजूर करावा. घाटनांदूर -दौंड (अंबाजोगाई -जामखेड मार्गे) तसेच बेलापूर (श्रीरामपूर)-परळी वैजनाथ (नेवासा-गेवराई मार्गे) या नवीन रेल्वे मार्गांच्या प्रकल्पांना गती देण्याची मागणीही करण्यात आली आहे. परळी वैजनाथ हे धार्मिक, व्यापारी व शैक्षणिकदृष्ट्या महत्त्वाचे केंद्र असल्याने रेल्वे सुविधांचा विस्तार झाल्यास बीड जिल्ह्यासह मराठवाड्याच्या विकासाला मोठी चालना मिळेल, असा विश्वास परळी रेल्वे विकास समितीने व्यक्त केला आहे. परळी वैजनाथ तालुक्यात दोन दिवस जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन हे दौऱ्यावर होते. तहसील कार्यालय येथे जिल्हाधिकारी यांना निवेदन देतांना सत्यनारायण दुबे कैलास तांदळे जीएस सौंदळे सर श्रीकांत पाथरकर आरजी स्वामी चेतन सौंदळे विलास ताटे आदींच्या निवेदनावर स्वाक्षऱ्या आहेत .

----------------------------------

पहिल्या फेरीत सुमितकुमारने उत्तर प्रदेशच्या रवी कुंतल याचा 9-3 अशा गुणफरकाने पराभव केला. त्यानंतर अंतिम फेरीत हरियाणाच्या नरेंद्र याच्याविरुद्ध झालेल्या लढतीत 7-1 अशा दिमाखदार विजयासह त्याने भारतीय संघात निवड मिळवली. सुमितकुमार गेल्या सहा वर्षांपासून अमोल बुचडे कुस्ती अकादमीत सराव करत असून महाराष्ट्र केसरी, रुस्तम-ए-हिंद पै. अमोल (भाऊ) बुचडे यांच्या मार्गदर्शनाखाली त्याची जडणघडण झाली आहे. त्याच्या या यशामागे सातत्यपूर्ण मेहनत, कठोर सराव आणि प्रशिक्षकांचे मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले आहे. आशियाई स्पर्धेच्या तयारीसाठी अखिल भारतीय कुस्ती महासंघाच्या वतीने लखनऊ येथील भारतीय खेळ प्राधिकरणाच्या प्रशिक्षण केंद्रात विशेष सराव शिबिर सुरु करण्यात आले आहे. सुमितकुमार आंतरराष्ट्रीय स्तरावरही उत्कृष्ट कामगिरी करून महाराष्ट्र व देशासाठी पदक जिंकण्याचा सर्वोत्तम प्रयत्न करेल, असा विश्वास वस्ताद पै. अमोल (भाऊ) बुचडे यांनी व्यक्त केला.

पै. सुमितकुमार भारस्कर यांची आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाल्याबद्दल त्यांचे, त्यांच्या कुटुंबीयांचे तसेच प्रशिक्षकांचे विविध स्तरांतून अभिनंदन होत आहे. पै. अमोल बुचडे, प्रा. किसन बुचडे, पै. विनोद गोरे, पै. समीर देसाई, पै. उत्कर्ष काळे, कोच नरेंद्र कुमार, अनिराज सुभेदार, हितेंद्र कांबळे, पोलीस निरीक्षक मिलिंद झोडगे, प्रा. महेश घुले आणि प्रा. संतोष पवार यांनी त्यांचे अभिनंदन करून आगामी स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

----------------------------------------

सात अपक्षांनी अर्ज दाखल केले होते. यापैकी 4 अपक्ष उमेदवार हे महाविकास आघाडीतील घटक पक्षांचे होते तर, 3 अपक्ष हे महायुतीतील घटक पक्षांचे होते. अर्ज मागे घेण्याच्या 4 जूनच्या दुपारी 1 वाजेपर्यंत यातील एकही अपक्ष उमेदवार माघारीसाठी धाराशिवच्या जिल्हाधिकारी कार्यालयात दाखल झाला नव्हता. दुपारी 1 वाजता रिपाइंचे पदाधिकारी तथा अपक्ष उमेदवार मिलिंद महालिंगे यांनी भाजप पदाधिकारी रामचंद्र तिरुखे यांच्यासमवेत येऊन आपला अर्ज मागे घेतला. पाठोपाठ भाजपच्या अर्चना गंगणे यांनीही आपला अपक्ष अर्ज मागे घेतला. यानंतर उर्वरित 5 अपक्ष उमेदवारांनी शेवटच्या अर्ध्या तासात आपापले अर्ज मागे घेतले. परिणामी, मतदारसंघातील लढतीचे चित्र स्पष्ट झाले असून, आता बसवराज पाटील व महेश देशमुख यांच्यात सरळ लढत होणार आहे. रिपाइंचे पदाधिकारी मिलिंद महालिंगे, भाजपच्या अर्चना गंगणे, राष्ट्रवादी शरद पवार गटाचे शरद यादव, सहालबीन आमेर चाऊस, राष्ट्रवादी अजित पवार गटाचे अहमदखान सय्यद तसेच उद्धवसेनेचे नगरसेवक सचिन पवार व संजय मुंदडा यांनी आपले अर्ज मागे घेतले आहेत. या सर्वांनीच अपक्ष म्हणून उमेदवारी दाखल केली होती. उद्धवसेनेचे धाराशिव पालिकेतील नगरसेवक सचिन पवार यांनी अपक्ष अर्ज दाखल केला होता. अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी त्यांनी भाजपच्या पदाधिकाऱ्यांसोबत येऊन अर्ज मागे घेतला. यानंतर त्यांनी उघडपणे या निवडणुकीत भाजपला साथ देत असल्याचे सूचित केले. परिणामी, धाराशिव पालिकेतील उद्धवसेनेत फाटाफूट झाल्याचे स्पष्ट होत आहे.

--------------------------------

मात्र, काही नागरिकांनी बेकायदेशीरपणे अतिक्रमण करून हा रस्ता पूर्णतः बंद केल्याने नागरिकांची गैरसोय वाढली आहे. त्यामुळे नगरपालिकेने तात्काळ हस्तक्षेप करून अतिक्रमण हटवावे व नागरिकांसाठी रस्ता खुला करून द्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

साहेबराव फड यांनी परिसरातील इतर नागरिकांच्या स्वाक्षऱ्यांसह सादर केलेल्या निवेदनात, आठ दिवसांच्या आत कार्यवाही न झाल्यास नगरपालिकेसमोर आमरण उपोषण करण्याचा इशाराही दिला आहे. तसेच पुढे उद्भवणाऱ्या परिस्थितीची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनाची राहील, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

या मागणीमुळे संबंधित परिसरातील अतिक्रमणाचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असून प्रशासन याबाबत काय भूमिका घेते, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

----------------------------------------

बैठकीत फडणवीस बोलत होते. गृह विभागाच्या अपर मुख्य सचिव मनीषा म्हैसकर, पोलीस महासंचालक सदानंद दाते, मुख्यमंत्री कार्यालयाचे अप्पर मुख्य सचिव लोकेश चंद्रा, प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी, राज्य गुप्तचर विभागाचे आयुक्त शिरीष जैन, वैद्यकीय शिक्षण विभागाचे सचिव धीरज कुमार, महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश परीक्षा (सीईटी) कक्षाचे आयुक्त दिलीप सरदेसाई, उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव बी. वेणुगोपाल रेड्डी, सहसचिव संतोष खोरगडे, राज्य सूचना विज्ञान अधिकारी सपना कपूर, तसेच संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी यावेळी उपस्थित होते.

नीटची परीक्षा सुरळीत पार पडण्यासाठी सर्व यंत्रणांनी सतर्कतेने काम करावे. सर्व परीक्षा केंद्रांवरील सीसीटीव्ही यंत्रणा कार्यरत ठेवून त्याचे नियंत्रण करण्याचे आदेश देताना फडणवीस यांनी सायबर सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक सर्व प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या. परीक्षा केंद्रांवर उमेदवारांची तपासणी व ओळख पडताळणी प्रक्रिया काटेकोरपणे राबवावी. परीक्षेसंदर्भातील अचूक माहिती विद्यार्थी, पालक आणि नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी समाज माध्यमांचा प्रभावी वापर करून व्यापक जनजागृती करण्यात यावी, तसेच परीक्षा प्रक्रियेबाबत अफवा किंवा दिशाभूल करणारी माहिती प्रसारित झाल्यास त्याचा तातडीने खुलासा करून विद्यार्थ्यांच्या आणि पालकांच्या मानत कोणताही संभ्रम निर्माण होणार नाही, याची विशेष काळजी घ्यावी अशा सूचनाही त्यांनी दिल्या.पुणे आणि लातूर येथील परीक्षा केंद्रांवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात यावे, परीक्षा केंद्रांवर कोणत्याही प्रकारचा गैरप्रकार होऊ नये, याची दक्षता घेण्याबरोबरच सुरक्षा व्यवस्था, वाहतूक नियोजन, वीजपुरवठा, पिण्याचे पाणी, वैद्यकीय सुविधा, पावसाच्या दृष्टीने पूर्वतयारी आणि विद्यार्थ्यांसाठी आवश्यक मूलभूत सुविधांची प्रभावी अंमलबजावणी करून परीक्षेच्या दिवशी विद्यार्थ्यांना कोणताही त्रास होणार नाही, यासाठी जिल्हा प्रशासन, पोलिस विभाग, शिक्षण विभाग आणि इतर संबंधित यंत्रणांनी सतर्क राहावे, असेही फडणवीस यांनी सांगितले.

राष्ट्रीय परीक्षण एजेंसी (एनटीए) महासंचालक अभिषेक सिंह यांनी सादरीकरणाद्वारे नीट महाराष्ट्रातील परीक्षा केंद्रांची संख्या, उपलब्ध सुविधा, सुरक्षा व्यवस्था आणि परीक्षा सुरळीत पार पाडण्यासाठी करण्यात आलेल्या नियोजनाची सविस्तर माहिती यावेळी दिली.

----------------------------------------

उपोषण मागे घेतले होते. त्या पैकी मराठा आरक्षण मागणीसाठी बलिदान देणाऱ्यांच्या वारसांना प्रत्येकी दहा लाख रुपये अनुदान देण्याची मागणी सरकारने मंजूर केली आहे.बलिदान देणाऱ्यांच्या 34 वारसांना प्रत्येकी दहा लाख रुपये देण्यासाठी एकूण 3 कोटी 40 लाखांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. आठ जिल्ह्यांतील 34 व्यक्तींच्या कायदेशीर वारसदारांना प्रत्येकी 10 लाख रुपयांची रक्कम दिली जाणार आहे. मराठा आरक्षणासाठी राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये झालेल्या आंदोलनात 309 जणांचा मृत्यू झाला होता.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्य सरकारने या मृत व्यक्तींच्या वारसदारांसाठी 27 कोटी 50 लाख रुपये मंजूर केले आहेत. यापैकी 34 व्यक्तींच्या कुटुंबांना मदत मिळणे अद्याप बाकी होते. अंतरवाली सराटी येथील मराठा आरक्षण आंदोलनादरम्यान मनोज जरांगे पाटील यांनी मृतांच्या वारसदारांना दिल्या जाणाऱ्या मदतीचा प्रश्न उपस्थित केला होता. राधाकृष्ण विखे पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा करून उर्वरित वारसांना तातडीने मदत देण्याची ग्वाही देण्यात आली होती.त्यानंतर आज राज्य सरकारकडून तातडीने मदत मंजूर करण्यात आली आहे. मराठवाड्यातील बीड जिल्ह्यात सर्वाधिक 15 मराठा कार्यकर्त्यांनी बलिदान दिले होते. धाराशिव 5, परभणी 4, हिंगोली 4, नांदेड 3, जालना 1, छत्रपती संभाजीनगर 1 आणि लातूर 1 अशा बलिदान देणाऱ्यांच्या वारसांना ही आर्थिक मदत दिला जाणार आहे.

---------------------------------

निशाणा बनवलं आहे. त्यामुळं काही तरुणांनी त्याला उघडपणे जीवेमारण्याची धमकीही दिली होती. या धमकी देणाऱ्यानं व्हिडिओद्वारे स्वतःची ओळख सांगत धमकी दिली होती, पण पोलिसांनी या व्यक्तीवर अद्याप कुठलीही कारवाई केलेली नाही. पण आता अभिजीत दिपके भारतात परतणार असल्यानं त्याच्या सुरक्षेसाठी दिल्ली विमानतळासह संभाजीनरमधील त्याच्या घराभोवतीही कडेकोड सुरक्षा तैनात करण्यात आली आहे.

## पान 4 वरुन

’ संबंधितांवर कायदेशीर कारवाई केली जाणार आहे.

--------------------------------------

व सेवाविषयक कामांसाठी प्रशासकीय कार्यालयात वारंवार जावे लागते. कर्मचाऱ्यांची ही ससेहोलपट थांबविण्यासाठी प्रशासनाने हे अत्यंत महत्त्वाचा पाऊल उचलले आहे. कर्मचारी समाधान शिबीरामुळे कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित तक्रारींचे निवारण होऊन प्रशासकीय कामाला मोठी गती मिळणार आहे. जर महिन्याच्या पहिल्या शुक्रवारी शासकीय सुट्टी आली, तर त्यापूर्वीच्या कामकाजाच्या दिवशी हे शिबीर घेतले जाणार आहे. सर्व संबंधित विभाग प्रमुखांना या सूचनांचे काटेकोर पालन करण्याचे आदेश देण्यात आले असून, कामात दिरंगाई किंवा हलगर्जीपणा करणाऱ्या अधिकाऱ्यांवर थेट जबाबदारी निश्चित केली जाणार आहे.

कर्मचारी समाधान शिबिराचे तालुका पातळीवर तहसीलदार यांच्या अध्यक्षतेखाली तहसील कार्यालयात, जिल्हा पातळीवर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात आणि विभागीय पातळीवर विभागीय आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली विभागीय आयुक्त कार्यालयात आयोजन आजच्या शुक्रवार पासून करण्यात येत आहे. अशीही माहितीही यावेळी देण्यात आली.

----------------------------------

सन्मानित करण्यात आले.

राज्यात अनुसूचित जातीचे उपवर्गीकरण संदर्भात कार्य, बौद्ध धम्माचे कार्य, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, आंबेडकरी विचारांची जनजागृती, आंबेडकरांची चळवळ गतिमान, गाठीशील, क्रियाशील करण्यासाठी प्रयत्नशील, राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघाचे, माजी राज्य कार्याध्यक्ष, वृत्तपत्रातून फुले, शाहू, आंबेडकर यांच्या विचारांचे लिखाण साप्ताहिक जन सन्मान दैनिक परळी सन्मानचे मुख्य संपादक, रिपब्लिकन सन्मान सभेचे -राष्ट्रीय मुख्य समन्वयक, वृत्तपत्रांमध्ये प्रखरमत, संपादकीय लेख, स्तंभलेखक, पत्रकारितेत संघटन कौशल्य, आंबेडकरवादी दृष्टिकोन, शैक्षणिक क्षेत्रात गेली तीस वर्षांपासून कार्यरत प्रा. डॉ. दशरथ वैजनाथ रोडे यांनी केलेल्या कार्याची दखल घेऊन त्यांना राज्यस्तरीय महाराष्ट्र रत्न पुरस्कार पुरस्काराने संगमनेर येथील मालपाणी लॉन्स भव्यदिव्य कार्यक्रमात अँड. संघराज रुपवते, साहित्यिक. प्रा. डॉ. मुकुंद भारसाकळे, अकोलेचे आ.किरण लहामटे. तेजस सेवा प्रतिष्ठाणचे संस्थापक अध्यक्ष डॉ. रविद्र घोसाळे यांच्या उपस्थित पुरस्कार देण्यात आला.

देशात भारतीय संविधानास 75 वर्ष पूर्ण झाल्याबद्दल संविधान अमृत महोत्सव आणि राज्यातील 75 बौद्ध उपासक आणि उपसीकांना एक ऐतिहासिक सण म्हणून बौद्ध समाजातील सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, क्रीडा, धम्म कार्य, साहित्यिक, चित्रपट, कला, औद्योगिक, आंबेडकरी अनुयायांना उल्लेखनीय कार्य करणाऱ्याना विविध क्षेत्रात राज्यस्तरीय महाराष्ट्र रत्न पुरस्कारांने सन्मानित करण्यात आले. तेजस सेवा प्रतिष्ठानच्यावतीने पुरस्कारांचे आयोजन करण्यात आला होता. याप्रसंगी राज्यातील विविध जिल्यातील विविध क्षेत्रातील संविधान अमृत महोत्सव साजरा करून राज्यात एक ऐतिहासिक सणचे तेजस सेवा प्रतिष्ठान संस्थापक अध्यक्ष डॉ रविद्र घोसाळे यांच्यासह कार्यक्रमात अँड. संघराज रुपवते, साहित्यिक. प्रा. डॉ. मुकुंद भारसाकअकोलेचे आ.किरण लहामटे.

अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत पुरस्कार सोहळा संपन्न झाला तसेच भारतीय संविधानाचे उद्देशिका सर्वांनी वाचन करून कार्यक्रमाचा समारोप करण्यात आले.

------------------------------------

उचलत असल्याचे दिसते. या ठिकाणी रात्री उशीरा चहा, नाष्टा, जेवण उपलब्ध असते. अडचणीत आलेल्या मंडळींसाठी हा नक्कीच दिलासा आहे. परंतु रिकामे लोक येऊन रात्रीच्या वेळी या कॅन्टीनला आपला अड्डा बनवत आहेत. यामुळे प्रवाशांच्या सुरक्षेला देखील धोका निर्माण झाला असून यावर आता बसस्थानक प्रशासन व पोलिसांनीच उपाययोजना करण्याची मागणी होत आहे.

पोलिस प्रशासनाशी पत्र्यवहार केला : पवार त्यांच्यापासून प्रवाशांच्या सुरक्षेला धोका निर्माण होऊ शकतो, त्यांच्यावर कारवाई करण्यासाठी आम्ही पोलिस प्रशासनास पत्रव्यवहार केलेला आहे. बसस्थानकात रात्रभर बसेस ये-जा करत असल्याने कॅन्टीन सुरु असते. परंतु त्या ठिकाणी कोणी यावे, कोणी नाही, हे आम्ही ठरवू शकत नाही. प्रवाशांना कोणतीही अडचण येणार नाही यासाठी आम्ही काळजी घेतो. बसस्थानक परिसरात सीसीटीव्ही कार्यान्वीत आहेत. याबरोबरच सुरक्षा रक्षकही तैनात करण्यात आलेले असतात अशी माहिती आगारप्रमुख पवार यांनी दिली.

बसस्थानक परिसरातही हवी पेट्रोलिंग बीड बसस्थानकाचा परिसर शिवाजीनगर पोलिस ठाण्याच्या हद्दीत येतो. बसस्थानक व बसस्थानकाच्या पाठीमागील रस्त्यावर अनेकदा मारामारीच्या घटना घडलेल्या आहेत. त्यातून एखादी मोठी दुर्घटना घडू नये याकरिता या भागात विशेष पेट्रोलिंग सुरु करण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

----------------------------------------

येऊ नये आणि संविधानिक अधिकारांचे संरक्षण व्हावे, या उद्देशाने या संघर्ष परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. या परिषदेत उपवर्गीकरणाच्या परिणामांवर सखोल चर्चा होणार असून समाजाच्या भविष्यासंदर्भात महत्त्वपूर्ण दिशा ठरविण्यात येणार आहे.

यावेळी डॉ. भिमराव आंबेडकर आणि सरसेनानी आनंदराज आंबेडकर हे समाजबांधवांना मार्गदर्शन करणार असून सामाजिक, राजकीय आणि संविधानिक प्रश्नांवर आपली भूमिका मांडणार आहेत. त्यामुळे बहुजन समाजातील युवक, विद्यार्थी, महिला, कार्यकर्ते व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून परिषद यशस्वी करावी, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

“शिका, संघटित व्हा, संघर्ष करा” या महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांना केंद्रस्थानी ठेवून आयोजित करण्यात आलेली ही परिषद बहुजन समाजाच्या एकजुटीचे प्रतीक ठरणार असल्याचे मत व्यक्त करण्यात येत आहे.उपवर्गीकरण होऊ देणार नाही.

----------------------------------------

टप्प्याचे काम पुर्ण होत आहे. दुसऱ्या टप्प्याचे काम राहिलेले आहे. चांभार गड हा किल्ला महाराष्ट्रातील संपुर्ण चांभार समाजाचा श्रध्देचा, अस्मितेचा, शौर्याचे प्रतिक असणारा गड आहे, त्यामुळे आपण परत, दुसऱ्यांदा शिफारसपत्र दिल्यास गडाचे दुसऱ्या टप्प्यातील काम सुरु होईल म्हणुन आपण परत एकदा दुसरे शिफारस पत्र द्यावे व चांभारगडास भेट द्यावी. तसेच मौजे चांभार खिंड, ता.महाड (जि.रायगड) येथील महेंद्रगड ऊर्फ चांभारगड या किल्यास प्रादेशिक पर्यटन व तिर्थक्षेत्र क गटात समाविष्ट करण्यात यावा अशी मागणी केली आहे. अशी माहिती समाजवादी पार्टीचे प्रदेश सचिव तथा चर्मकार सेलचे प्रदेशाध्यक्ष ऍड.शिवाजी कांबळे यांनी दिली आहे.

------------------------------------

देण्यात आली आहे. इच्छुकांनी ही पुस्तिका खरेदी करून आपला प्रवेश दि.30 जूनपूर्वी निश्चित करावा. अधिक माहिती आणि संपर्कासाठी बीड वसतीगृह अधीक्षक 9421616223, अंबाजोगाई वसतीगृह अधीक्षक 9780897883 या क्रमांकावर त्वरित संपर्क साधावा.

----------------------------------------

जिल्ह्याच्या पालकमंत्री यांच्या शुभहस्ते आणि अध्यक्षतेखाली हा मुख्य सोहळा संपन्न होणार आहे.

शासकीय मार्गदर्शक सूचनेनुसार, शनिवार दि. 6 जून रोजी जिल्हा परिषद परिसरात भगव्या स्वराज्य ध्वजासह शिवशक राजदंड आणि स्वराज्यगुढी उभारण्यात येणार आहे. यावेळी स्वराज्य ध्वजास मानवंदना व अभिवादन केले जाईल. हा भव्य सोहळा जिल्हा परिषदेचे सर्व माजी पदाधिकारी, सर्व विभागांचे खातेप्रमुख, अधिकारी आणि कर्मचारी उपस्थितीत पार पडणार आहे. असेही कळविले आहे.

-------------------------------------

नुकसानीचा सामना केला. अनेक ठिकाणी पावसाच्या लहरीपणा मुळे उत्पादन घटले. काही भागात दुबार पेरणी करावी लागली. खर्च वाढला, उत्पादन कमी झाले आणि बाजार भावानेही साथ दिली नाही. अशा परिस्थितीत पीकविमा नुकसान भरपाई हा शेवटचा आधार ठरेल अशीअपेक्षा होती आता महसूल मंडळाच्या सरासरी उत्पादनाच्या वाढली तर संपूर्ण मंडळ भरपाईपासून वंचित राहते. यामुळे अनेक शेतकऱ्यांचा प्रश्न आहे की, शेजारच्या शेतात पीक आले म्हणून माझ्या नुकसानाची भरपाई का नाकारली जाते असा प्रश्न उपस्थित केला जात आहे तरी शासन काही तोडगा काढणार का असे चर्चा सत्र नागरिकांन मध्ये सुरु झाले आहे.

-------------------------------------

आहेत .अशातच अवकाळी वादळ झाल्यामुळे सोलार पॅनलचे नुकसान भरपाई शासन दरबारी मांडून मिळणे अशी शेतकऱ्यांच्या मनामध्ये खंत आहे .

-----------------------------------

प्रत्यक्ष घटनास्थळी पाहणी करुन गेले होते, आणि चार दिवसात घटनास्थळी येऊन अतिक्रमण हटवू असे आश्वासन दिले होते.परंतु एक महिना उलटून गेला वस्तीवरील नागरिक जिल्हा परिषद बांधकाम विभागाला चकरा मारुन बेजार आहेत तरीही अजून अतिक्रमण हटवलं जात नाही, आणि कारवाईची प्रक्रिया विचारल्याच्या नंतर उडवा उडवी चे उत्तर देतात आणि अतिक्रमणाचा विषय टाळतात म्हणजे वस्तीवरील नागरिकांना समाधानकारक उत्तर मिळत नाही. तुमचे तेवढेच अतिक्रमण नाही तर सर्व रस्त्यावरीलच अतिक्रमण हटवून देतो असे अभियंता व उप अभियंता साहेब सांगतात,परंतु ज्या ठिकाणी अतिक्रमण झाले आहे व ज्या ठिकाणावरील तक्रार अर्ज आहे तेथील अतिक्रमण हटवले जात नाही,म्हणून आज वस्तीवरील नागरिकांनी एकजूट होऊन नवीन चार्ज घेतलेले कार्य तत्पर तहसीलदार मा. पवार साहेब यांच्याकडे लेखी स्वरुपात निवेदन दिले व संबंधित अतिक्रमणाची सर्व माहिती तोंडी पण सांगितली. निवेदन देताना वस्तीवरील नागरिक तहसीलदार साहेबांनी येत्या चार दिवसात म्हणजे सोमवारी अतिक्रमण काढण्यात येईल असे आश्वासन दिले व संबंधित जिल्हा परिषद बांधकाम विभाग केज कार्यालयास फोन करुन चौकशी केली व लेखी पत्रही देण्याचे सांगितले आहे. तरी मा तहसीलदार साहेब यांच्या म्हणण्यावर विश्वास व्यक्त करत वस्तीवरील नागरिक समाधानी झाले अशी माहिती वस्तीवरील नागरिक कानिफनाथ विठ्ठल चौरे, धर्मराज सकाहरी चौरे, नामदेव यंका चौरे, महादेव दिनकर चौरे, कृष्णा विठ्ठल चौरे, श्रीराम विठ्ठल चौरे यांनी वृर्तवाहिनीस सांगितली आहे.

-------------------------------------

परवाना, स्वच्छता व अन्न सुरक्षा नियमांची पडताळणी करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. भेसळयुक्त अथवा निकृष्ट दर्जाचे अन्नपदार्थ विक्री करणाऱ्यांवर कठोर कारवाई झाल्यास नागरिकांच्या आरोग्याचे संरक्षण होण्यास मदत होईल, असे मत नागरिकांनी व्यक्त केले आहे. नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने विभागाने तातडीने विशेष तपासणी मोहीम हाती घ्यावी, अशी मागणी जोर धरत आहे.

----------------------------------



हॅलो बीड
परळी संघर्षनेता
शनिवार दि. 06 जुन 2026

# FDA ची बीड जिल्ह्यात मोठी कारवाई; 102 लिटर लस्सी नष्ट, मुदतबाह्य तेल-खारीकचा साठा जप्त




बीड : अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंडे यांच्या आदेशानुसार बीड जिल्ह्यात अन्नपदार्थांमधील भेसळ आणि प्रतिबंधित पदार्थांच्या विक्रीला आळा घालण्यासाठी कारवाई सुरु करण्यात आली आहे. बीड तालुक्यातील एका लस्सी उत्पादन केंद्रावर छापा टाकून 102 लिटर लस्सी नष्ट करण्यात आली. माजलगाव शहरात 71 किलो रिफाइंड सोयाबीन तेलाचा साठा जप्त करण्यात आला आहे, तर शिरूर शहरात 158 किलो मुदतबाह्य खारीक जप्त करण्यात आली आहे. बीड जिल्ह्यात अन्नपदार्थांतील भेसळ व प्रतिबंधित पदार्थांच्या विक्रीला लगाम लावण्यासाठी अधिकाऱ्यांनी मागील सात दिवसांपासून कारवाईचे सत्र सुरु केले आहे. बीड तालुक्यातील एका लस्सी उत्पादन केंद्रावर छापा टाकून लस्सी तयार करण्यासाठीचे मुदतबाह्य फ्लेव्हर वापरले जात असल्याचे समोर येताच 8 हजार 125 रुपयांची 102 लिटर लस्सी नष्ट करण्यात आली आहे. केज येथे मिठाईच्या दुकानाची तपासणी करत मिठाईचे दोन नमुने विश्लेषणासाठी घेण्यात आले. पाटोदा तालुक्यात दोन दूध संकलन केंद्रांवर तपासणी करून दुधाचे 2 नमुने घेण्यात आले. माजलगाव शहरात तपासणी करून 71 किलो रिफाइंड सोयाबीन तेलाचा साठा जप्त करण्यात आला आहे. शिरूर शहरात मोठी कारवाई करत 24,806 रुपये किमतीची 158 किलो मुदतबाह्य खारीक जप्त करण्यात आली आहे. 2 जून रोजी वडवणी येथील एका किराणा दुकानातून 23,580 रुपयांचा गुटखा जप्त करत वडवणी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अन्न व औषध प्रशासन विभागाच्या कारवाईत जप्त करण्यात आलेले अन्नपदार्थांचे नमुने विश्लेषणासाठी प्रयोगशाळेत पाठवण्यात आले आहेत. प्रयोगशाळेचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर 'अन्न सुरक्षा आणि मानके कायद्यांतर्गत पान 3 वर

# बीड येथे पहिले कर्मचारी समाधान शिबीर जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या मार्गदर्शनात संपन्न




बीड ,दि.5(जिमाका): शासकीय सेवेतील कार्यरत आणि सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित सेवाविषयक अडचणी आता तातडीने मार्गी लागणार आहेत. विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांच्या संकल्पनेतून संपूर्ण विभागात दर महिन्याच्या पहिल्या शुक्रवारी कर्मचारी समाधान शिबीर आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तरी बीड येथे पहिले कर्मचारी समाधान शिबीर जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या मार्गदर्शनाखाली उत्साहात पार पडले.

जून महिन्यातील पहिल्या जिल्हास्तरीय शिबिराचे आयोजन शुक्रवार, दि. 5 जून 2026 रोजी सकाळी 11 वाजता बीड जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवनात करण्यात आले. यावेळी प्र. निवासी उपजिल्हाधिकारी श्री. सोनी, उपजिल्हाधिकारी कैलास सूर्यवंशी, तहसीलदार श्री.मेंडके यांची प्रमुख उपस्थिती होती.

बीड जिल्ह्यातील सर्व संबंधित अधिकारी- कर्मचारी आणि विविध संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी या शिबिरास उपस्थित राहून आपल्या सेवाविषयक समस्या अर्जाद्वारे सादर कराव्यात, असे आवाहन जिल्हा प्रशासनाकडून यावेळी करण्यात आले.

अनेकदा शासकीय कर्मचाऱ्यांना वेतन, पदोन्नती, रजा, निवृत्तीवेतन किंवा सेवापुस्तिका अद्यावत करणे यासारख्या वैयक्तिक पान 3 वर

# प्रा.डॉ.दशरथ रोडे यांना राज्यस्तरीय महाराष्ट्र रत्न पुरस्काराने सन्मानित..!






परळी (प्रतिनिधी) राज्यात आणि देशात भारतीय संविधानाचे शिल्पकार, भारतरत्न, बोधिसत्त्व, महामानव, परमपूज्य, मानवतावादीचे उद्धारकर्ते, कामगारांचे नेते, कायदेपंडित, सिम्बॉल ऑफ नॉलेज,जागतिक कीर्तीचे अर्थतज्ञ, रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे निर्माते, डॉ बाबासाहेब आंबेडकरांची सामाजिक, शैक्षणिक, धम्म कार्य, जनजागृती चळवळ आणि भारतीय संविधान अमृत महोत्सव वर्षाचे औचित्य साधून राज्यातील विविध क्षेत्रातील 75 बौद्ध उपासक - उपासकांना संयुक्त राज्यस्तरीय महाराष्ट्र रत्न पुरस्कारांने तेजस सेवा प्रतिष्ठाणनच्यावतीने अहिल्यनगर जिल्यातील संगमनेर तालुकात भवदिव्य सोहळ्यात पान 3 वर

# बीड बसस्थानकात रात्री हौशा-नवशांची गर्दी

## रात्रभर सुरू राहणाऱ्या कॅन्टीनचा परिणाम; प्रवाशांची सुरक्षा धोक्यात




बीड, : बीड बसस्थानकात रात्रभर बसेसची ये-जा असते, त्यामुळे प्रवाशांचीही वर्दळ असते. परंतु यामध्ये बीड शहरातील हौशा-नवशांची देखील भर पडत असून रात्रभर सुरु राहणाऱ्या कॅन्टीनमुळे या परिसरात गर्दी वाढत आहे. यातून प्रवाशांच्या सुरक्षेला देखील धोका निर्माण झाला आहे. यावर उपाययोजना कोण करणार? असा प्रश्न या निमित्ताने उपस्थित होत आहे. बीड शहरातील बसस्थानक परिसरात चालणारे अवैध प्रकार जगजाहीर झाले आहेत. पोलिस आणि बसस्थानक प्रशासन याची जबाबदारी एकमेकांवर ढकलून मोकळे होत असले तरी यामुळे प्रवाशांची सुरक्षा धोक्यात येत आहे. सोलापूर-धुळे महामार्गावर मध्यवर्ती स्थानक म्हणून बीडची ओळख आहे. या बसस्थानकात रात्रीच्या वेळी देखील मोठ्या प्रमाणात बसेस ये-जा करतात. त्यांच्या सुरक्षेसाठी केवळ एक सुरक्षा रक्षक तैनात असतो, तो देखील कोणत्या कोपऱ्यात बसलेला असतो, त्यालाच माहीत. तर दुसरीकडे बसेस न मिळणारे, उशिराने बस असलेले अनेक प्रवासी बसस्थानकातच झोप लेले असतात. त्यांच्याकडील रोख रक्कम, दागिन्यांची चोरी होऊ शकते, याबरोबरच एखादी अप्रिय घटना देखील घडू शकते. परंतु त्याबाबत बसस्थानक प्रशासन आणि पोलिस प्रशासने फारसे गंभीर नसल्याचे दिसते. यात भर पडते ती रात्रभर उघड्या राहणाऱ्या कॅन्टीनमुळे. बीड शहरातील हॉटेल्स रात्री अकरा वाजेपर्यंत सुरु असतात. त्यानंतर बहुतांश बाजारपेठ बंद होते. परंतु बसस्थानकातील कॅन्टीन मात्र रात्रभर सुरु असते. प्रवाशांच्या सोयीसाठी ही कॅन्टीन उशिरापर्यंत सुरु ठेवली जात असावी, असे दिसते. परंतु याचा फायदा बीड शहरातील हौशे-गवशे लोक पान 3 वर

# भीमराव आंबेडकर व आनंदराज आंबेडकर यांच्या प्रमुख उपस्थितीत

## उपवर्गीकरणविरोधी संघर्ष परिषदेसाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे - पुरुषोत्तम वीर





बीड प्रतिनिधी : सामाजिक न्याय, संविधानिक हक्क आणि बहुजन समाजाच्या एकतेच्या प्रश्नावर आयोजित करण्यात आलेल्या "उपवर्गीकरणविरोधी संघर्ष परिषद" या महत्त्वपूर्ण परिषदेस बहुजन समाजातील नागरिकांनी हजारोंच्या संख्येने मराठवाड्यातील जनतेने उपस्थित राहावे, असे आवाहन रिपब्लिकन सेनेचे बीड जिल्हाध्यक्ष पुरुषोत्तम (गोटू) वीर यांनी केले आहे.

ही परिषद दि. 07 जून 2026 रोजी सायंकाळी 6 वाजता तापडिया नाट्य मंदिर, निराला बाजार, छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित करण्यात आली आहे. या परिषदेला भारतीय बौद्ध महासभेचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष आदरणीय डॉ. भिमराव यशवंतराव आंबेडकर तसेच रिपब्लिकन सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष सरसेनानी आनंदराज आंबेडकर यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

देशभरात अनुसूचित जातींच्या आरक्षणामध्ये उपवर्गीकरणाचा मुद्दा चर्चेत असताना बहुजन समाजाच्या हक्कांवर गदा पान 3 वर

# महेंद्र गड उर्फ चांभार गड प्रादेशिक पर्यटन व तीर्थक्षेत्र क गटात समाविष्ट करावा

## मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांना समाजवादी पार्टीचे प्रदेश सचिव ॲड.शिवाजी कांबळे यांचे निवेदन



अंबाजोगाई (प्रतिनिधी) मौजे चांभारखिंड, ता.महाड (जि. रायगड) येथील महेंद्र गड ऊर्फ चांभार गड हा किल्ला प्रादेशिक पर्यटन व तीर्थक्षेत्र क गटात समाविष्ट करावा अशी मागणी करून महाराष्ट्र राज्याच्या पर्यावरण, वातावरणीय बदल, पशुसंवर्धन विभागाच्या मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांना समाजवादी पार्टीचे प्रदेश सचिव तथा चर्मकार सेलचे प्रदेशाध्यक्ष ॲड.शिवाजी कांबळे यांनी गुरुवार, दिनांक 4 जुन 2026 रोजी निवेदन दिले आहे.

समाजवादी पार्टीचे प्रदेश सचिव तथा चर्मकार सेलचे प्रदेशाध्यक्ष ॲड.शिवाजी कांबळे यांनी महाराष्ट्र राज्याच्या पर्यावरण, वातावरणीय बदल, पशुसंवर्धन विभागाच्या मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांना दिलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, सदरील विषयी यापूर्वी दिनांक 3 सप्टेंबर 2025 रोजी ना.शंभुराजे देसाई (मंत्री, पर्यटन, महाराष्ट्र राज्य.) यांचे नांवे आपण शिफारसपत्र दिलेले होते. त्यामुळे मंत्री ना.भरतशेठ गोगावले यांचे फंडातून पायऱ्याचे एका पान 3 वर

# सैनिकी मुलांच्या वसतीगृहासाठी प्रवेश प्रक्रिया सुरू

बीड ,दि.5(जिमाका): जिल्ह्यातील आजी, माजी सैनिक, युद्ध विधवा आणि विधवांच्या पाल्यांसाठी एक महत्त्वाची बातमी आहे. शैक्षणिक वर्ष 2026-27 करीता बीड आणि अंबाजोगाई येथील सैनिकी मुलांचे वसतीगृह आगामी 1 जुलै 2026 पासून पूर्ण क्षमतेने सुरु होत आहे. या वसतीगृहामध्ये प्रवेश मिळविण्यासाठी आता अर्ज प्रक्रिया सुरु करण्यात आली असून, इच्छुकांनी दि.30 जून 2026 पर्यंत आपले प्रवेश अर्ज सादर करावेत, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी स्कॉड्रन लीडर विद्यासागर कोरडे (नि.) यांनी केले आहे.

बीड आणि अंबाजोगाई येथे शिक्षण घेणाऱ्या आजी व माजी सैनिकांच्या पाल्यांना या वसतीगृहात प्राधान्याने प्रवेश दिला जातो. पाल्यांच्या पदानुसार अत्यंत अल्प दरात (शुल्क) ही निवासी सोय उपलब्ध करून दिली जाते. विशेष म्हणजे, विधवांच्या मुलांना या वसतीगृहामध्ये पूर्णपणे विनामूल्य प्रवेश दिला जाणार आहे. तसेच जागेच्या उपलब्धतेनुसार इतर नागरिक पाल्यांचाही प्रवेशासाठी विचार केला जातो.

प्रवेशासाठी लागणारी प्रवेश पुस्तिका संबंधित वसतीगृह अधीक्षकांकडे उपलब्ध करून पान 3 वर

# जिल्हा परिषद मुख्यालयात शिवस्वराज्य दिनाचे आयोजन




बीड ,दि.5(जिमाका): छत्रपती शिवाजी महाराजांच्या दैदिप्यमान राज्य कारभाराच्या आणि सार्वभौमत्वाच्या प्रेरणेचा उत्सव असलेला शिवस्वराज्य दिन शनिवार दि.6 जून 2026 रोजी बीड जिल्हा परिषद मुख्यालयात अत्यंत उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. तरी सर्वांनी या कार्यक्रमाला उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहेमान यांनी केले आहे.

महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायती, पंचायत समित्या आणि जिल्हा परिषद कार्यालयामध्ये हा दिवस साजरा केला जातो. बीड जिल्हा परिषदेत सकाळी ठीक 9:00 वाजता बीड पान 3 वर

# नुकसान भरपाई संदर्भात काळा बाजार केला ?

## उत्पादन जास्त दाखवल्याने अनेक शेतकरी वंचित !



केज प्रतिनिधी/ रोहन गलांडे

केज , अंबाजोगाई तालुक्यातील खरीप 2025 हंगामात दुष्काळ, पाऊसखंड, रोगराई, अतिवृष्टी आणि घटलेल्या उत्पादनामुळे संकटात सापडलेल्या केज तालुक्यातील लाखो शेतकऱ्यांना आता आणखी एका धक्क्याला सामोरे जावे लागत आहे.पीकविमा नुकसान भरपाईची अपेक्षा बाळगणाऱ्या शेतकऱ्यांना महसूल मंडळातील पीक कापणी प्रयोगात सरासरी उत्पादन जास्त आल्याचे कारण देत नुकसान भरपाई नाकारली जात असल्याची माहितीसमोर येत आहे. शेतकरी विचारत आहेत आमच्या शेतात नुकसान झाले, मग कागदावर भरघोस उत्पादन आले कुठून?पीक नाही, विमा नाही मग योजना कोणासाठी?बीड जिल्ह्यातील केज , अंबाजोगाई तालुक्यांमध्ये शेतकऱ्यांनी सोयाबीन, कापूस, तूर, उडीद, मूग, मका, कांदा, आंबा, मोसंबी, केळी, आणि इतर पिकांमध्ये मोठ्या पान 3 वर

# अवकाळी पाऊस, वाऱ्याने सोलार पॅनेलचे खाली मुंडकं वर पाय ! शेतकऱ्यांची नुकसान भरपाईची मागणी !




केज प्रतिनिधी/रोहन गलांडे केज तालुक्यातील मौजे हनुमंत पिंपरी येथील शेतकरी रोहीत रविंद्र चंदनशिव यांच्या सर्वे नंबर 44 मधील शेतात सोलर पॅनल बसवलेले होते ते दिनांक 25-5-2026 रोजी अवकाळी पावसामुळे व जोरदार सुसाट्याच्या वाऱ्यामुळे शेतात बसवलेले सोलार पॅनल साक्षात खाली मुंडकं वर पाय झाले आहे. अचानक आलेल्या वादळ वाऱ्यासह आलेल्या पावसाने हाहाकार माजवला सोलर पॅनल नुकसान झालेल्या शेतकऱ्यांचा पंचनामा महसुलाधिकारी यांच्या समक्ष करण्यात आला त्यातील नुकसान झालेल्या शेतकऱ्यांचे नाव रोहीत रविंद्र चंदनशिव सोलर पॅनल नुकसान झालेल्या शेतकऱ्यांची नाव आहे ग्राम महसूल अधिकारी यांच्या समवेत पंच यांनी प्रत्यक्ष शेतात जाऊन पंचनामा केला असता प्रत्यक्ष शेतकऱ्याचे अतोनात नुकसान झालेले आहे सध्या पाण्याचे टंचाई लाईटचा कमीपणा यामुळे शेतकऱ्यांनी सोलार पॅनल बसवले अतिशय आनंदामध्ये दिवसा सोलर पॅनलने आपली शेती भिजवण्याचे काम करत आपला उदरनिर्वाह भागवत पान 3 वर

# जीवाचीवाडी मध्ये एडका वस्तीवर जाणाऱ्या रस्त्यावर शेतकऱ्यांनी केलेले अतिक्रमण हटविण्याची मागणी !




केज प्रतिनिधी/रोहन गलांडे

केज तालुक्यातील जीवाची वाडी ते एडका वस्ती या रस्त्यावर डांबरी पट्ट्याच्या शेजारी तीनशे मीटर लांबीची दगडी पोवळ घातली आहे त्यासंदर्भात वस्तीवरील सर्व नागरिकांनी 7 मे 2026 रोजी कार्यतत्पर तहसीलदार अशोक भंडारे साहेब यांच्याकडे अतिक्रमण हटवण्याकरिता निवेदन दिले होते तहसीलदार साहेबांनी सार्वजनिक बांधकाम विभाग कार्यालय केज यांना पत्रही काढले होते,परंतु त्यांच्या अखत्यारित येत नसल्याने त्यांनी जिल्हा परिषद बांधकाम विभाग केज कार्यालयाला पत्र दिले होते की संबंधित घटनास्थळाची पाहणी करून अतिक्रमण हटवण्यात यावे,ग्राम महसूल अधिकारी, मंडळ अधिकारी, व जिल्हा परिषद बांधकामाचे अभियंता शरद वीर साहेब हे पान 3 वर

# केज,अंबाजोगाई तालुक्यात दुग्धजन्य पदार्थ, फळ विक्रेत्यांच्या फळांच्या तपासणीची नागरिकांची मागणी!



केज प्रतिनिधी/ रोहन गलांडे

केज तालुक्यातील लस्सी, ताक, मावा, कुल्फी, आईस्क्रीम तसेच विविध फळांची विक्री करणाऱ्या विक्रेत्यांकडील फळांची अन्न व औषध प्रशासन विभागाने विशेष तपासणी मोहीम राबवावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. उन्हाळ्याच्यादिवसांमध्ये लस्सी, ताक, कुल्फी व फळांची मोठ्या प्रमाणात विक्री होत असते. मात्र अनेक ठिकाणी स्वच्छतेच्या नियमांचे पालन होत नसल्याच्या तक्रारी समोर येत आहेत ठिकाणी दुग्धजन्य पदार्थांची साठवणूक अयोग्य पद्धतीने केली जात असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. तसेच वापरले जाणारे पाणी, बर्फ, दूध व इतर साहित्याची गुणवत्ता तपासली जावी, अशीही मागणी होत आहे. विभागाने शहर व ग्रामीण भागातील किराणा दुकान विक्रेत्यां कडून नमुने घेऊन प्रयोगशाळेत तपासणी करावी, तसेच पान 3 वर

